रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड मंगळवार । दि. ९ जून २०२६ । अंक ३ । पृष्ठे ८ । किंमत ४ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## इराणचा इस्त्रायलवर मोठा हल्ला


**नवी दिल्ली :** इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्ध थांबायचे सोडून अधिक भडकताना दिसत आहे. त्यामध्येच इस्त्रायलवर थेट मोठ्या मिसाईलने इराणने हल्ला केला. युद्धविराम लागू झाल्यानंतर इराणचा हा पहिल्याच हल्ला आहे. या हल्ल्यानंतर स्थिती अधिक बिकट झाली असून, मध्य पूर्वेत तणाव अधिक वाढला आहे. रविवारी (दि.७) रात्री उशिरा इस्त्रायलवर दोन्ही बाजूने हल्ला झाला. इराणने एका बाजूने मिसाईल हल्ला केला, तर दुसऱ्या बाजूला लेबनानकडून हिजबुल्लाह यांनीही मिसाईल हल्ला इस्त्रायलवर केला.

## होर्मुझमध्ये २४ भारतीय खलाशी अडकले

**नवी दिल्ली :** इराणने रविवारी रात्री इस्त्रायलवर बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली. तेहरान, तब्रीझ आणि इस्फाहानमध्ये अनेक स्फोट झाले. अमेरिका-इराण तणावाच्या पार्श्वभूमीवर, होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये ओमानच्या किनाऱ्याजवळ एका जहाजावर हल्ला झाल्याचे वृत्त समोर आले आहे. भारतीय खलाशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या फॉरवर्ड सीमेन्स युनियन ऑफ इंडिया या संघटनेने दावा केला आहे की, जहाजावर २४ भारतीय खलाशी आहेत आणि त्यांनी तातडीच्या मदतीचे आवाहन केले आहे.

# 12 जूनला होणार

# 329 ग्रामपंचायतींच्या आरक्षणाचा फैसला



- ■ ३२९ ग्रामपंचायतींच्या आरक्षणाचा फैसला
- ■ सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम शुक्रवारी
- ■ प्रशासकीय राजवट लवकरच संपणार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींवर गेल्या अनेक वर्षांपासून प्रशासकीय राजवट सुरू आहे. निवडणुकांचा कार्यक्रम कधी जाहीर होणार, याकडे वेगवेगळ्या राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांचे लक्ष लागून राहिले आहे. आता मात्र ही उत्कंठा लवकरच संपणार आहे. २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या आणि २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ३२९ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीच्या कार्यालयात शुक्रवारी (दि.१२) आरक्षण सोडत होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील ८१० ग्रामपंचायतींपैकी २४० ग्रामपंचायतींवर प्रशासकीय राजवट असून, २०२६ या कालावधीत ८९ ग्रामपंचायतीची मुदत संपणार आहे. एकूण ३३६ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम प्रशासनाकडून जाहिर करण्यात आला आहे. शुक्रवारी विशेष ग्रामसभा बोलावून तहसीलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षणाची सोडत काढण्यात येणार आहे. त्यामध्ये अनुसुचीत जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासप्रवर्ग, अनुसुचित जाती महिला, अनुसुचित जमाती महिला, नागरिकांचा मागासप्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला आरक्षण काढले जाणार आहे. या आरक्षणानंतर प्रभागनिहाय आरक्षण प्रारुप अधिसुचनेला बुधवारी (दि.१७) जून रोजी जिल्हाधिकारी मान्यता देणे. शुक्रवार •➤ पान २ वर

### अलिबागमधील ३८ ग्रामपंचायतींचा समावेश

मूदत संपलेल्या आणि मुदत संपणाऱ्या अलिबाग तालुक्यातील शहापूर, आंबेपूर, श्रीगांव, कुसुंबळे, पोयनाड, कुर्डूस, बेलोशी, चिंचोटी, सारळ, रांजणखार, डावली, थळ, वरसोली, रामराज, सुडकोली, मापगांव, सातिर्जे, चेंढरे, बेलकडे, कुरुळ, ढवर, काविर, बामणगांव, सहाण, वरंडे, बोरघर, चौल, आगरसुरे, झिराड, धोकवडे, रेवस, परहूर, चरी, कुरकूंडी कोलटेंभी, ताडवागळे, मानतर्फे झिराड, सासवणे, पेझारी, वाघोडे या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी सदस्यांच्या आरक्षणाची सोडत होणार आहे. सकाळी अकरा ते दुपारी दोन या वेळेत मंडळ अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत आरक्षण सोडतीचा कार्यक्रम होणार असल्याची माहिती अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील यांनी दिली.




# शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा

### इंडिया आघाडीच्या बैठकीत एकमत

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

नवी दिल्लीत सोमवारी (दि.८) इंडिया आघाडीची बैठक पार पडली. या बैठकीला देशभरातील २५ पक्षांचे नेते हजर होते. या बैठकीनंतर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटले की, आघाडीची बैठक आता दर दोन महिन्यांनी आयोजित केली जाईल. तसेच, या बैठकीत पाच मुद्द्यांवर एकमत झाल्याही माहिती खरगे यांनी दिली असून, केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या तात्काळ राजीनाम्याची मागणीवर देखील सर्वांचे एकमत झाल्याचे त्यांनी सांगितले.

नवी दिल्लीत सोमवारी इंडिया आघाडीची बैठक पार पडली. या बैठकीला विरोधी पक्षनेते राहुल गांधी, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव, आरजेडी नेते तेजस्वी यादव, टीएमसी प्रमुख ममता बॅनर्जी, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणिस जयंत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे, जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला, पीडीपी प्रमुख मेहबूबा मुफ्ती यांच्यासह देशभरातील २५ पक्षांचे नेते हजर होते. त्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि •➤ पान २ वर

# कर्मचाऱ्यांची धावाधाव

### जनगणनेची माहिती देण्यासाठी तहसील कार्यालयात गर्दी



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पहिल्या टप्प्यातील घरगणना आणि घरयादीची प्रक्रिया गेल्या अनेक दिवसांपासून सुरु आहे. ही गणना दि.१४ जूनपर्यंत पुर्ण करण्याचे आदेश आहेत. मात्र, तहसील कार्यालयाकडून सोमवारी (दि.८) कामांची माहिती देण्याची सुचना आल्यावर सर्व कर्मचाऱ्यांची धावाधाव झाली. अलिबागसह अन्य तहसील कार्यालयात जनगणनेच्या कामाचा अहवाल देण्यासाठी कर्मचाऱ्यांची गर्दी दिसून आली. जिल्हाधिकारी •➤ पान २ वर

# छतावरून पडून कामगाराचा मृत्यू

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड एमआयडीसीतील रिलायबल केमिकल कंपनीच्या परिसरात रविवारी (दि.७) सकाळी अपघात घडला. छतावरील तुटलेल्या सिमेंट पत्र्याची दुरुस्ती करताना कामगाराचा तोल जाऊन खाली पडल्याने मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास सवाने येथील रिलायबल केमिकल कंपनीत ही घटना घडली. श्रवणकुमार राजाराम यादव हे जितेंद्र तेज बहादुर गौतम यांच्या बरोबर कंपनीच्या •➤ पान २ वर

# दादरमध्ये बेस्टचा थरार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

दादर (प.) येथील प्लाझा सिनेमासमोरील वीर कोतवाल उद्यान परिसरात सोमवारी (दि.८) सकाळच्या सुमारास एक भीषण अपघात घडला. एका भरधाव विद्युत बेस्ट बसने एका दुचाकी आणि चारचाकी वाहनाला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून, चार पादचाऱ्यांना गंभीर दुखापत झाली आहे. कंत्राटी चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडल्याचे बोलले जात आहे.



**दोघांचा मृत्यू, चारजणं गंभीर**

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी सकाळच्या सुमारास नियंत्रण कक्षाला या अपघाताची माहिती मिळाली. बेस्ट प्रशासनाची रूट क्र. ४६३/३१ ही बस दादर टीटीच्या दिशेने जात असताना प्लाझा सिनेमाजवळ कंत्राटी चालकाचा विद्यूत बसवरील ताबा सुटला. वेगात असलेल्या या बसने रस्त्यावरील एका •➤ पान २ वर

# कशेडी घाटात अपघात

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावर पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटात एक भरधाव कार पुढे जाणाऱ्या डंपरच्या मागील भागात घुसल्याने दोन जण गंभीर जखमी झाले. या भीषण अपघातानंतर एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर महिला गंभीर जखमी झाल्याने तिला एमजीएम हॉस्पिटल कळंबोली येथे अधिक उपचारासाठी पाठवण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई-गोवा महामार्गावर सोमवारी (दि.८) दुपारच्या सुमारास कशेडी घाटातील भुयारी महामार्गावरून



**उपचारादरम्यान एकाचा मृत्यू**

मुंबईकडे भरधाव वेगाने जाणारी आयटेन कार नियंत्रित न झाल्याने थेट पुढे जाणाऱ्या डंपरच्या मागील भागात घुसली. या अपघातात कारच्या दर्शनी भागाचा चुराडा झाला. •➤ पान २ वर




# माजी सरपंचांना अपमानास्पद वागणूक

- ग्रामस्थांकडून निषेध करून बदलीची मागणी
- २२ जूनपासून आमरण उपोषणाचा इशारा



। खोपोली । प्रतिनिधी ।

खालापूर नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी कोमल कराळे यांनी शिवसेना ठाकरे गटाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या व खालापूरच्या माजी सरपंच मनोरमा साळवी (८१) यांना अपमानास्पद वागणूक दिल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. याप्रकरणी मुख्याधिकारी कोमल कराळे यांच्याविरोधात निषेध व्यक्त करत त्यांच्या बदलीची मागणी करणारे निवेदन नगराध्यक्षा रोशना मोडवे व तहसीलदार यांना देण्यात आले आहे. तसेच, संबंधित प्रकरणाची चौकशी करून शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मुख्याधिकारी यांची तात्काळ बदली न झाल्यास २२ जूनपासून आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा अतुल साळवी यांनी दिला आहे.

मनोरमा (बेबी) साळवी यांनी खालापूर ग्रामपंचायतीचे सरपंचपद तीन वेळा भूषविले असून तंटामुक्ती समिती, शांतता समिती तसेच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्या अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत. गुरुवारी (दि.५) त्या आदिवासी बांधवांच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नासह खालापूर येथील शंकर मंदिराजवळील विहिरीची पावसाळ्यापूर्वी साफसफाई व गाळ काढण्याची मागणी मांडण्यासाठी नगरपंचायत कार्यालयात गेल्या होत्या. मात्र, काही दिवसांपूर्वी घरपट्टीच्या प्रश्नावर गावकऱ्यांनी काढलेल्यामोर्चातसहभागीझाल्याचा राग मनात धरून मुख्याधिकारी कोमल कराळे यांनी त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याऐवजी दालनातून बाहेर बसण्यास सांगितल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, उपस्थित अधिकाऱ्याला त्यांना पाणी देण्यास सांगून दालनाबाहेर जाण्यास सांगितल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

या घटनेच्या निषेधार्थ देण्यात आलेल्या निवेदनावेळी नगराध्यक्षा रोशना मोडवे, माजी उपनगराध्यक्ष संतोष जंगम, ज्येष्ठ नेते नवीनचंद्र घाटवळ, माजी नगराध्यक्षा शिवानी जंगम, नगरसेविका सुप्रिया साळुंखे, माजी नगरसेवक उमेश गावंड, माजी उपसरपंच मंदाताई भोसले, महेश राठी, मिलिंद पाटील, दत्ता बुवा चाळके, मनोहर पत्की, हरेश मोडवे, चंद्रकांत पारंगे, उमेश पडवकर, मंगेश चाळके, नितीन बोंडार्डे, विजय भोसले, अतुल साळवी, मनोज साळवी, स्मिता साळवी यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान, माध्यमांशी बोलताना मनोरमा साळवी यांनी सांगितले की, मी कोणत्याही वैयक्तिक किंवा खासगी कामासाठी मुख्याधिकाऱ्यांकडे गेले नव्हते. सार्वजनिक आरोग्य, पिण्याचे पाणी आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांशी संबंधित प्रश्न मांडण्यासाठी गेले होते. माझी बाजू समजून घेणे, अर्ज स्वीकारणे किंवा समस्येवर चर्चा करणे अपेक्षित होते. मात्र, मुख्याधिकारी कोमल कराळे यांनी माझ्याशी अत्यंत अपमानास्पद, असंवेदनशील आणि अयोग्य वर्तन केले, असे त्यांनी सांगितले.

# अटल सेतू की मृत्यूचा मार्ग?

- पुण्याच्या तरुणाची समुद्रात उडी

। उरण । प्रतिनिधी ।

देशाच्या प्रगतीचे प्रतीक म्हणून गाजविण्यात आलेला अटल सेतू पुन्हा एकदा गंभीर प्रश्नांच्या भोवऱ्यात सापडला आहे. पुणे जिल्ह्यातील शिरूर येथील २८ वर्षीय प्रतिक सुभाष रासकर या तरुणाने पहाटेच्या सुमारास कार थांबवून थेट समुद्रात उडी घेतल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेनंतर अटल सेतूवरील सुरक्षा व्यवस्थेचे अक्षरशः धिंडवडे निघाले असून, हा पूल नेमका विकासाचा महामार्ग आहे की मृत्यूचा मार्ग, असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रतिक रासकर हा आपल्या कारने मुंबईच्या दिशेने जात होता. पहाटे सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास त्याने अटल सेतूवर कार थांबवली आणि काही क्षणांतच समुद्रात उडी घेतली. प्रशासनाला त्याची माहितीही वेळेत मिळाली नाही, ही बाबच सुरक्षेच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उभी करणारी आहे. अटल सेतूवर अत्याधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा, नियंत्रण कक्ष, सुरक्षा कर्मचारी आणि देखरेखीच्या मोठमोठ्या घोषणा करण्यात आल्या होत्या. मग एका तरुणाने कार थांबवून समुद्रात उडी घेईपर्यंत ही यंत्रणा नेमकी काय करत होती? हा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिक विचारू लागले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे अटल सेतूवर यापूर्वीही अशा स्वरूपाच्या घटना घडल्या आहेत. प्रत्येक घटनेनंतर चौकशी, उपाययोजना आणि सुरक्षेच्या घोषणा केल्या जातात. मात्र, प्रत्यक्षात परिस्थिती जैसे थेच असल्याचे पुन्हा समोर आले आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच उलवे पोलीस, सागरी सुरक्षा यंत्रणा आणि बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली. समुद्रात शोधमोहीम सुरू असली तरी उशिरापर्यंत प्रतिक रासकर याचा शोध लागलेला नव्हता. दरम्यान, त्याच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अटल सेतूवर वारंवार घडणाऱ्या अशा घटना प्रशासनाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहेत. आणखी किती जीव गेल्यानंतर सुरक्षा व्यवस्थेची खरी दखल घेतली जाणार, असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून विचारला जात आहे.



# रसायनीतील प्राथमिक शाळेवर बंदीची टांगती तलवार

**१० जूनपासून आमरण उपोषणाचा इशारा**

। रसायनी । प्रतिनिधी ।

मोहोपाडा येथील महिला उद्योग मंडळ संचलित प्राथमिक शाळेविरोधातील तक्रारींवर शिक्षण विभागाकडून कारवाई होत नसल्याच्या निषेधार्थ अरुण गायकवाड यांनी दि.१० जूनपासून रायगड प्राथमिक शिक्षण विभागाच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. मोहोपाडा आळी-आंबिवली येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी ही घोषणा केली.

गायकवाड यांनी शाळेवर अनेक गंभीर आरोप केले आहेत. ६० टक्के शासन अनुदानित असतानाही विद्यार्थ्यांकडून मासिक फी व देणगीच्या स्वरूपात रक्कम वसूल केली जात असल्याचा दावा त्यांनी केला. तसेच स्वतःची जागा नसताना शाळा एचओसी कंपनीच्या जागेत चालविली जात असून, वाढीव तुकड्याही विनापरवानगी सुरू असल्याचा आरोप करण्यात आला. शाळेचीइमारतधोकादायकअसल्याचे बांधकाम विभाग व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अहवालात नमूद असूनही विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचे गायकवाड यांनी सांगितले. शिक्षण विभागाच्या चौकशीतही शाळा विनापरवानगी स्थलांतरित झाल्याचे आणि जीर्ण इमारतीत भरत असल्याचे निष्पन्न झाल्याचा दावा त्यांनी केला. याप्रकरणी अरुण गायकवाड व सामाजिक कार्यकर्ते आकाश कांबळे यांनी धर्मादाय आयुक्त, शिक्षण विभाग आणि इतर संबंधित यंत्रणांकडे तक्रारी दाखल केल्या आहेत. विद्यार्थ्यांकडून घेतलेली फी व इतर रक्कम व्याजासह पालकांना परत करावी, तसेच दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. या प्रकरणामुळे संबंधित शाळेच्या भवितव्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे पालक व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# समाजहिताच्या उपक्रमांना प्राधान्य देणारः डॉ. पाटील

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

अलिबाग-मुरूड मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर वैद्यकीय सेवांची गुणवत्ता वाढविणे, डॉक्टरांचे प्रश्न सोडविणे आणि समाजहिताचे उपक्रम राबविण्यावर भर देणार असल्याचे प्रतिपादन नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. संजय पाटील यांनी केले. नेत्रदान मोहिमेला विशेष प्राधान्य देत मुरूडमधील डॉक्टरांनी त्यासाठी विशेष प्रशिक्षण घेतल्याची माहितीही त्यांनी दिली.



मुरूड येथील वसंतराव नाईक महाविद्यालयात झालेल्या बैठकीत डॉ. रविंद्र नामजोशी यांच्या अध्यक्षतेखाली नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी डॉ. संजय पाटील, उपाध्यक्षपदी डॉ. रेखा म्हात्रे व डॉ. सोनाली नाईक, सचिवपदी अमित बेनकर, सहसचिवपदी डॉ. समीर धाटावकर व डॉ. सुलतान हसवरे, खजिनदारपदी आदेश मोकल, सहखजिनदारपदी डॉ. निशिकांत थोंबरे व डॉ. भाविका कल्याणी यांची निवड झाली. मार्गदर्शक म्हणून डॉ. मयुर कल्याणी, सांस्कृतिक सचिव म्हणून डॉ. भाग्यश्री धाटावकर व डॉ. अमोल ठाकूर, आयोजन सचिव म्हणून डॉ. अमृता गावळी, डॉ. समीर बागडे, डॉ. रश्मी गंभीर तर क्रीडा सचिव म्हणून डॉ. वसीम पेशीमाम व डॉ. भूषण शेळके यांची निवड करण्यात आली.

यावेळी डॉ. अशिष भगत, डॉ. संदेश पाटील, डॉ. अनघा भगत, डॉ. रवी म्हात्रे, डॉ. सुनीता पाटील, डॉ. मकरंद आठवले, डॉ. गणेश गावळी, डॉ. उज्वल जैन, डॉ. खानावकर, डॉ. राजाराम मोकळ, डॉ. राज कल्याणी आदी उपस्थित होते.

मार्गदर्शक डॉ. मयुर कल्याणी यांनी असोसिएशनने गेल्या १९ वर्षांत मोफत आरोग्य शिबिरे, जनजागृती उपक्रम आणि वैद्यकीय क्षेत्रातील अद्ययावत ज्ञानासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेतला. नव्या कार्यकारिणीने वैद्यकीय शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि सभासदांच्या हितासाठी कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# गुंगीचे औषध देऊन अत्याचार

**पुणे** : एका २० वर्षीय युवतीला खाद्यपदार्थात गुंगीचे औषध देऊन तिच्यावर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी महेश करपे (धारूर) व पवन कराड (पांगरी) यांच्याविरुद्ध शनिवारी (दि.६) रात्री शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, केज तालुक्यातील या युवतीचा पाठलाग करून तिला जबरदस्तीने मंच्युरियन खाऊ घातले. त्यात गुंगीचे औषध असल्याने ती बेशुद्ध झाली. त्याचा गैरफायदा घेत तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर तिचे फोटो व व्हिडिओ काढून ब्लॅकमेल करत फेब्रुवारी ते जून दरम्यान वारंवार अत्याचार केला. तिच्याकडून ३ लाख रुपये व साडेसहा तोळे सोने उकळले, तसेच पुणे येथील लॉजवर नेऊन अत्याचार केला.

# माहिती अधिकारासाठी सहा महिन्यांपासून फरफट

- पेण पंचायत समितीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह
- ग्रामविकास मंत्र्यांकडे भाजप कार्यकर्ता करणार तक्रार

। पेण । प्रतिनिधी ।

माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागविलेली माहिती मिळवण्यासाठी एका भाजप कार्यकर्त्याला तब्बल ६ महिन्यांहून अधिक काळ पंचायत समिती कार्यालयाच्या उंबरठ्यावर हेलपाटे मारावे लागत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. विशेष म्हणजे, भाजपची सत्ता असलेल्या पेण पंचायत समितीतच भाजपच्या कार्यकर्त्याला माहिती मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कारावी येथील रहिवासी तथा भाजप कार्यकर्ते चंद्रकांत खंडू पाटील यांनी १७ डिसेंबर, २०२५ रोजी कारावी ग्रामपंचायतीतील सन २०२३ पासूनचे शासकीय नमुने १ ते ३३, ग्रामसभा व मासिक सभांच्या इतिवृत्तांची माहिती माहिती अधिकार कायद्यानुसार मागितली होती. मात्र अर्ज करून सहा महिने उलटूनही संबंधित माहिती देण्यात आलेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. माहिती न मिळाल्याने पाटील यांनी दि.६ मार्च रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर दि.२४ मार्च रोजी त्यांना पंचायत समिती कार्यालयात बोलावण्यात



आले. मात्र, त्या दिवशीही माहिती न देता दि.११ मेची तारीख देण्यात आली. दि.११ मे रोजीही माहिती न मिळाल्याने त्यांनी पुन्हा पाठपुरावा केला. त्यानंतर विस्तार अधिकारी तथा प्रथम अपिलीय अधिकारी विक्रांती तांडेल यांनी दि.२६ मे रोजी माहिती देण्याचे लेखी आश्वासन दिले. मात्र, त्या दिवशीही पाटील यांना माहिती मिळाली नाही. उलट उडवाउडवीची उत्तरे देत आणखी १५ दिवसांनी येण्यास तोंडी सांगण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

माहिती अधिकार कायद्यानुसार निश्चित मुदतीत माहिती देणे बंधनकारक असताना संबंधित अधिकाऱ्यांकडून सातत्याने टाळाटाळ होत असल्याने नियमांना हरताळ फासला जात असल्याची चर्चा सुरू झाली आहे. एका पक्षाच्या कार्यकर्त्याची ही अवस्था असेल, तर सर्वसामान्य नागरिकांना न्याय कसा मिळत असेल, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची सविस्तर लेखी तक्रार महाराष्ट्राचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे येत्या आठ दिवसांत करण्यात येणार असल्याची माहिती चंद्रकांत पाटील यांनी दिली. या तक्रारीनंतर संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीची चौकशी होणार का, याकडे आता लक्ष लागले आहे.

## पान १ वरून

### शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा

झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनीही व्हर्च्युअल माध्यमातून बैठकीत सहभाग घेत आपली मते मांडली. इंडिया आघाडीच्या बैठकीनंतर आयोजिक पत्रकार परिषदेत बोलताना खरगे यांनी म्हटले की, पाच महत्त्वाच्या मुद्द्यांवर सर्व पक्षांमध्ये सहमती झाली आहे. पहिला मुद्दा म्हणजे मतदार यादीतील कथित गैरप्रकार आणि मतांची चोरी याविरोधात सरन्यायाधीशांना पत्र लिहिणे. दुसरा मुद्दा म्हणजे नीट-यूजी पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी करणे. तिसरा मुद्दा देशातील आर्थिक परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी सर्वपक्षीय बैठक बोलावण्याचा आहे. चौथा मुद्दा म्हणजे इंडिया आघाडीची बैठक दर दोन महिन्यांनी होईल आणि पुढील बैठक दि.८ ऑगस्ट रोजी हैदराबाद येथे आयोजित केली जाईल. पाचवा मुद्दा संसदेत सर्व विरोधी पक्षांमधील समन्वय कायम ठेवण्याचा आहे, असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना मल्लिकार्जून खरगे यांनी, 'एसआयआर, मतदार यादीतील कथित गैरव्यवहार आणि निवडणुकांमधील गैरप्रकारांविरोधात सरन्यायाधीशांना पत्र पाठवण्यावर एकमत झाले आहे. हे पत्र लवकरच सरन्यायाधीशांकडे सुपूर्द केले जाईल. केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या तात्काळ राजीनाम्याची मागणी करण्यावरही सर्व पक्ष सहमत झाले आहेत. कारण नीट आणि सीबीएसईच्या परीक्षा देणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांचा विश्वासघात झाला आहे, असेही त्यांनी म्हटले आहे.

### कशेडी घाटात अपघात

या अपघातामध्ये कल्याण येथील लिसी बालन (६३) व त्यांचा मुलगा निकेश बालन यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांना कशेडी पोलिसांनी पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. मात्र, निकेश बालन याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. तर, लीसी बालन यांना गंभीर दुखापत झाल्याने एमजीएम हॉस्पिटल कळंबोली-पनवेल येथे पाठवण्यात आले आहे. दरम्यान, क्रेनच्या साह्याने दोन्ही अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या बाजूला करून महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात आली. या अपघाताची नोंद पोलादपूर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### ३२९ ग्रामपंचायतींच्या आरक्षणाचा फैसला

(दि.१९) रोजी आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करणे. त्यानंतर गुरुवार दि.२५ जूनपर्यंत प्रभाग निहाय आरक्षण निश्चितीबाबत हरकती व सुचना दाखल करणे. उपविभागीय अधिकारी यांनी शुक्रवार दि.३ जूलै रोजी प्राप्त हरकती विचारात घेऊन अभिप्राय देणे. त्यानंतर जिल्हाधिकारी यांच्याकडून अंतिम अधिसुचनेला मान्यता ८ जूलैला देण्याची प्रक्रीया राबविली जाणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

### कर्मचाऱ्यांची धावाधाव

यांची जनगणनेच्या कामाबाबत बैठक होणार असल्याने सर्वांची तारांबळ उडाल्याचे बोलले जात आहे. देशाच्या इतिहासातील १६ वी तर स्वातंत्र्यानंतरची आठवी जणगणना आहे. ही प्रक्रीया दोन टप्प्यात राबविण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात घरगणना आणि घरयादी स्वरुपात गणना प्रक्रीया घेण्यात आली आहे. ५ हजार ९८ प्रगणक, ८६३ पर्यवेक्षक, ६९ क्षेत्रीय प्रशिक्षक तसेच १५ तहसीलदार आदी यंत्रणा गेल्या अनेक दिवसांपासून कामाला लागली आहे. दि.१ मेपासून ही प्रक्रीया सुरु केली आहे. घरोघरी जाऊन घरगणना केली जात आहे. काही कर्मचारी कडक उन्हात तर काही कर्मचारी सायंकाळी अथवा सकाळी लवकर गणनेचे काम करीत आहेत. दि.१४ जूनपर्यंत ही प्रक्रीया असल्याने अनेक कर्मचारी त्यांच्या सोयीनुसार गणना करण्याचे काम करीत होते. हा कालावधी संपण्यासाठी एक आठवडा शिल्लक होता. मात्र, गणनेबाबतची बैठक जिल्हाधिकारी जावळे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात येणार आहे. तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारी यांची बैठक घेतली जाणार आहे. त्यामुळे घरगणनेच्या कामाचा आढावा घेण्यासाठी तहसीलदारांनी कर्मचाऱ्या सोमवारी कार्यालयात हजर राहण्यास सांगितले. दि.१४ जूनपर्यंत मुदत असताना अहवाल, नकाशे जमा करण्याच्या सुचना तहसील कार्यालयातून आल्यावर कर्मचाऱ्यांची धावाधाव झाली. काही कर्मचाऱ्यांनी नाराजीही व्यक्त केली. तर, काही कर्मचाऱ्यांचे काम पुर्ण झाल्यावर त्यांनी अहवाल व नकाशा जमा करण्याचे काम केले. त्यामुळे सोमवारी (दि.८) तहसील कार्यालयात कर्मचाऱ्यांनी गर्दी केली. यावेळी संपुर्ण तहसील कार्यालय या कामातच व्यस्त असल्याचे दिसून आले. जिल्हाधिकारी मंगळवारी बैठक घेणार असल्याने सर्वांची तारांबळ उडाली असल्याची चर्चा सुरू होती.

### दादरमध्ये बेस्टचा थरार

चारचाकी आणि एका दुचाकी वाहनाला पाठीमागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की त्यात दोघांचा मृत्यू झाला आहे. बेस्ट बस चालकाचे वाहनावरील नियंत्रण अचानक सुटल्याने हा अपघात घडल्याचे बोलले जात आहे. नियंत्रणाबाहेर गेलेल्या बसने रस्त्यावरील वाहनांना धडक दिली आणि त्यानंतर रस्त्यावरून जात असलेल्या एका दुचाकीस्वाराला चिरडले. या भीषण धडकेत दुचाकीचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि आपत्कालीन सेवांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जखमींना उपचारांसाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यापैकी तिघांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. बेस्ट चालकाचा ताबा सुटल्याने हा अपघात झाला की बसमध्ये काही तांत्रिक बिघाड झाला होता, याचा तपास स्थानिक पोलीस करत आहेत.

तसेच, या अपघाताचा सीसीटीव्ही व्हिडिओ समोर आला आहे. जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२५ या तीन वर्षांच्या कालावधीत बेस्ट बसचे ९५८ अपघात झाले. त्यामध्ये ७७ जणांचा मृत्यू आणि २१७ जण जखमी झाले. यापैकी ८५ टक्क्यांपेक्षा जास्त अपघात सुमारे ८१५ अपघात हे भाडेतत्त्वावरील बसशी संबंधित होते. २०२५ मध्ये ६०६ मोठे आणि किरकोळ अपघात नोंदवले गेले असून, त्यापैकी ५८२ अपघात भाडे त्तवावरील बसांचे होते.

### छतावरून पडून कामगाराचा मृत्यू

छतावरील तुटलेले सिमेंटचे पत्रे दुरुस्त करण्यासाठी गेले होते. पाहणी करताना श्रवणकुमार यादव हे तुटलेल्या पत्र्यावर चढले. त्याचवेळी अचानक पत्रा तुटल्याने ते सुमारे २० ते २५ फूट उंचीवरून थेट जमिनीवर कोसळले. डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मात्र, एमआयडीसीतील कंपन्यांमध्ये कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. उंचीवर काम करताना सुरक्षेची साधने वापरण्यात आली होती का, याचा तपास पोलीस करत आहेत. कंपनी प्रशासनाने सुरक्षा नियमांचे पालन केले की नाही, याचीही चौकशी होणार आहे.

# मच्छिमारांना दुष्काळ जाहिर करा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

वादळी वारे, बदलते हवामान, समुद्रातील प्रदुषण, मासळीचे घटते प्रमाण अशा अनेक कारणांमुळे मासेमारीवर मोठा परिणाम होऊ लागला आहे. कृषी दर्जा असूनही कोणत्याही प्रकारचा लाभ मच्छिमारांना मिळत नाही, असा आरोप महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ, मुंबईचे माजी अध्यक्ष तथा महालक्ष्मी मच्छिमार सोसायटीचे चेअरमन विजय गिदी यांनी केला आहे. तसेच, मच्छिमारांना दुष्काळ जाहीर करून त्यांना अर्थसहाय्य देण्यात यावे, अशी मागणी देखील गिदी यांनी केली आहे. याबाबत मुरूडच्या तहसीलदार यांना पत्र देण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्याला २४० किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. अलिबाग, पनवेल, पेण, मुरूड, रेवदंडा, किहीम, सासवणे, मांडवा, रेवस, नवगाव, बोर्ली, मुरूड, राजपूरी, श्रीवर्धन, दिवेआगर अशा अनेक भागात मोठ्या प्रमाणात मासेमारी करणारा वर्ग आहे. जिल्ह्यात सुमारे ५ हजार मासेमारी बोटी आहेत. त्यात काही यांत्रिकी आणि काही विना यांत्रिकी बोटींचा समावेश आहे. मासेमारी करून त्यांच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालविणारे मोठ्या प्रमाणात आहेत. खोल समुद्रात जाऊन मासेमारी करणे, बाजारात मासळी विकणे अशा अनेक प्रकारची कामे केली जातात. मासेमारी व्यवसायावर अवलंबून असणारी मंडळी मोठ्या प्रमाणात आहेत. महाराष्ट्रातील मच्छिमारांना गेल्या तीन वर्षांमध्ये वादळी वारे, अवकाळी पाऊस, बदलते हवामान अशा अनेक संकटांना सामोरे जावे लागले. त्यामुळे मासळीचे प्रमाण घटत आहे. सध्या जून ते जूलै या कालावधीत मासेमारीला बंदी आहे. त्यामुळे मच्छिमार मोठ्या संकटात सापडले आहेत. मासेमारी व्यवसाय उभा करण्यासाठी मच्छिमारांनी बँकाकडून घेतलेले कर्ज फेडण्याची नामुष्की ओढावली आहे. त्यामुळे मच्छिमार कर्जबाजारी झाले आहेत.

मच्छिमारांना आर्थिक संकटातून मुक्त करण्यासाठी दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांप्रमाणे अर्थसहाय्य करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ मुंबईचे माजी चेअरमन विजय गिदी यांनी केली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा आदेश काढून शेतकऱ्यांना सरसकट २ लाख रुपयांची कर्जमुक्ती योजना काढली आहे.

# पीएनपी नाट्यगृहात शिवराजाभिषेक सोहळा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

लोणारे येथील शिवप्रेमी सामाजिक संस्थेच्यावतीने शिवराजाभिषेक सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त मंगळवारी (दि.९) संध्याकाळी साडेसहा वाजल्यापासून विविध कार्यक्रम होणार आहेत.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रायगडमधील होणाऱ्या पहिल्या मंदिराच्या प्रतिकृतीचा अनावरण सोहळा, छत्रपती शिवाजी महाराज यांचे नवीन व्हिडीओ गाणे प्रदर्शित, छत्रपती शिवरायांवर अधारित कराओके गाण्यांची राज्यस्तरिय स्पर्धा, त्यानंतर महाराजांच्या शौर्य आणि इतिहासाला उजाळा देणारा कार्यक्रम होणार आहे. या सोहळ्यानिमित्ताने ''शिवशंभू गाथा'' हा ऐतिहासिक कार्यक्रम घेतला जाणार आहे. एकच राजा इथे जन्मला फेम गायक शिवरत्न भुषण रोहित पाटील, कलर्स मराठी वाहिनीमधील गौरव महाराष्ट्राचा महाविजेता गायक वैभव थोरवे, सोनी टिव्हीवरील पहिला मराठी इंडियन आयडॉल विजेता गायक सागर म्हात्रे, सुप्रसिद्ध गायिका सानिया जांबेकर, पुजा म्हात्रे यांच्या बहारदार आवाजाने वेगवेगळ्या गाण्याचा आनंद घेता येणार आहे.



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे नसरापुर, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आहे, या मिळकतीचे मालक प्रमोद पोपट लंभाते यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक/ भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १०/९ | ००-५१-७१ हे.आर.पॉ. ५१७१ चौ.मी. | ५१७.१० |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून, ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक- ०९ जुन २०२६

**ॲड.शरद आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला,
बी विंग, विहंग को.ऑ.हौ.सो.लि.कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## निवडक



### नगरसेवक म्हात्रेंकडून ज्येष्ठांना छत्री वाटप

**पनवेल :** पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक दशरथ म्हात्रे यांच्यावतीने खांदा कॉलनी येथील खांदेश्वर परिसरात ज्येष्ठ नागरिकांसाठी छत्री वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीचा विचार करून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या कार्यक्रमाला पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, खांदा कॉलनीचे नगरसेवक एकनाथ गायकवाड, भाजपा युनियन लीडर मोतीराम कोळी, भाजपा नेते मुंडे, उद्योजक सुरेश म्हात्रे, बिल्डर संजय पाटील सुभाष गावडे, दत्ता कुळकर्णी, केबीसीचे महेंद्र कांबळे, प्रकाश जाधव, आझाद ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष कृष्णा पाटील, ज्येष्ठ नागरिक कट्टा ग्रुपचे अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे, परिसरातील नियमितपणे मंदिर परिसरात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना प्रत्यक्ष भेटून त्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले. उपस्थित नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक करत आयोजकांचे आभार मानले.



### स्व. अशोकदादा साबळे यांची ८२ वी जयंती साजरी

**माणगाव :** शिक्षण, समाजसेवा आणि जनकल्याण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे लोकनेते व शिक्षणमहर्षी स्व. अशोकदादा साबळे यांच्या ८२ व्या जयंतीनिमित्त माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या साबळे विद्यालयातील मोरेश्वर सभागृहात भावपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. अशोकदादा साबळे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी गोरेगाव येथील ज्येष्ठ विचारवंत नंदकुमार मराठे यांनी विशेष व्याख्यानातून अशोकदादांच्या शिक्षणप्रेमी, दूरदृष्टी असलेल्या व्यक्तिमत्त्वाचा गौरव केला. जयंतीनिमित्त दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला साबळे परिवार, संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशोकदादांच्या कार्याच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.



### खोपोली शहरात पाणीटंचाई

**खोपोली :** खोपोली नगरपालिकेने शहरात एकवेळ पाणीपुरवठा सुरू केल्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. गृहनिर्माण सोसायट्या आणि सामान्य नागरिकांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. नगरपालिकेचा अपुरा पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना दरमहा हजारो ते लाखो रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. खोपोली शहरात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती असल्याने पाणीपुरवठा करण्यासाठी नगरपालिकेने काजुवाडी येथील रविंद्रनाथ टागोर जलशुध्दी केंद्रात लाखो लीटरच्या टाक्या उभारून खोपोली शहरातील शेवटच्या टोकापर्यंत पाणीपुरवठा केला जातो. पाणीपुरवठा विभागाने एक महिण्यापूर्वीच शहरात एक वेळ पाणीपुरवठा सुरू आहे. उन्हाळ्यामुळे आणि पावसाळा लांबल्यामुळे अनेक सोसायट्यांमधील बोरवेला पाणीच नसल्यामुळे खासगी टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा करावा लागत आहे. महिलांमधील नाराजीची सूर निघत आहे. यदा मान्सून उशिरा असल्याने पाणीटंचाईचे संकट खोपोली शहरावर अटळ असून, खोपोली नगरपालिका शहरात दोन वेळ पाणीपुरवठा कधी करणार की पाणीटंचाईचा सामना करावा लागणार, अशी संताप व्यक्त करीत आहे.

# तिसरी मुंबई शेतकऱ्यांच्या प्रेतावरच उभी राहील

## न्यायमूर्ती बी.जी. कोळसे पाटील यांचा इशारा

दत्तात्रेय म्हात्रे
। चिरनेर ।

एमएमआरडीएच्या प्रस्तावित कर्नाळा-साई-चिरनेर-नवनगर अर्थात 'तिसरी मुंबई' प्रकल्पाविरोधात रायगड जिल्ह्यातील शेतकरी, भूमीपुत्र आणि ग्रामस्थांनी संघर्षाची रणशिंगे फुंकली आहेत. चिरनेर येथील ऐतिहासिक जंगल सत्याग्रह हुतात्मा स्मारक भूमीत रविवारी झालेल्या भव्य शेतकरी मेळाव्यात माजी न्यायाधीश बी.जी. कोळसे पाटील यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल करत, ''सरकारला तिसरी मुंबई उभी करायची असेल तर ती शेतकऱ्यांच्या प्रेतावर उभी करावी लागेल'' असा थेट इशारा दिला.




कोळसे पाटील म्हणाले, ''जनशक्तीपेक्षा मोठे कोणीही नाही. शेतकऱ्यांच्या विरोधातील तीन कृषी कायदे केंद्र सरकारला मागे घ्यावे लागले, हा जनतेच्या एकजुटीचा विजय होता. आता रायगडमधील शेतकऱ्यांनीही आपल्या जमिनी, घरे, संस्कृती आणि अस्तित्व वाचवण्यासाठी एकजूट दाखवली पाहिजे. एक इंचही जमीन देणार नाही, असा निर्धार प्रत्येकाने केला पाहिजे.'' त्यांनी सरकार, प्रशासन आणि राजकीय नेतृत्वावरही गंभीर प्रश्न उपस्थित करत, ''न्यायालय, पोलीस आणि सरकार आपले नाहीत; पण शेतकरी हा या सरकारचा बाप आहे,'' असे परखड विधान केले. ''घटना आणि कायद्याच्या चौकटीत राहून आंदोलन करू, पण कोणतीही तडजोड करणार नाही. जनतेने लढ्यात उतरले पाहिजे आणि त्यात माझा पहिला क्रमांक असेल,'' असेही ते म्हणाले.

या मेळाव्यास माजी आमदार मनोहर भोईर, माजी आमदार बाळाराम पाटील, न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील, सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन, वैशाली पाटील, डॉ. मनीष पाटील, अविनाश ठाकूर, सुधाकर पाटील, भास्कर मोकल, संतोष ठाकूर, सचिन घबाडी, दीपक कातकरी, समाधान ठाकूर, महेश म्हात्रे, रवी घरत, सुरेश पाटील, नारायण घरत, प्रफुल्ल खारपाटील, भूषण पाटील, महेंद्र ठाकूर, निलेश पाटील, मेघनाथ पाटील यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हजारो शेतकरी उपस्थित होते.

सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन यांनी तिसऱ्या मुंबई प्रकल्पावर जोरदार टीका करत, ''हा प्रकल्प शेतकरी, शेतमजूर किंवा सर्वसामान्य नागरिकांसाठी नसून फक्त बिल्डरांसाठी आहे,'' असा आरोप केला. त्यांनी भूसंपादन कायदा २०१३ मधील सामाजिक परिणाम अभ्यासाची तरतूद डावलण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित करत सरकारला धारेवर धरले. ''शेतकरी, आगरी, कोळी, कुणबी, आदिवासी आणि शेतमजुरांच्या भविष्याचा अभ्यास न करता भूसंपादनाची प्रक्रिया पुढे नेता येत नाही. मग हा अभ्यास झाला आहे का?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. एमएमआरडीए, नयना आणि सिडको या संस्था भांडवलदारांच्या हितासाठी काम करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

माजी आमदार बाळाराम पाटील यांनी सरकारसमोर ''ज्याची जमीन, तोच विकासक'' हे तत्त्व मांडण्याची गरज व्यक्त केली. ''आपल्या जमिनी सरकारला द्यायच्या नाहीत, ही भूमिका ठाम ठेवली तरच आपले अस्तित्व टिकून राहील,'' असे ते म्हणाले.

### आमच्या जमिनी देणार नाही

सभेच्या अखेरीस उपस्थित शेतकरी, महिला, युवक आणि विविध सामाजिक संघटनांनी एकमुखाने ''नाही... नाही... कधीही नाही... आमच्या जमिनी देणार नाही!'' अशी घोषणा देत तिसऱ्या मुंबई प्रकल्पाला तीव्र विरोध दर्शवला. ''शेती, घरे, गावे आणि आमचे अस्तित्व संपवणाऱ्या तिसऱ्या मुंबईची एकही वीट रचू देणार नाही,'' असा निर्धारही व्यक्त करण्यात आला.

### ८० हजार एकर शेती धोक्यात

उरण, पनवेल आणि पेण तालुक्यांतील १२४ गावांमधील सुमारे ८० हजार एकर सुपीक शेती या प्रकल्पासाठी संपादित होणार असल्याचा दावा करण्यात आला. यापूर्वी नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित झालेल्या जमिनींमुळे स्थानिक शेतकरी आणि समाज उद्ध्वस्त झाल्याचा आरोपही सभेत करण्यात आला.

## कृषीवलकडून सलीम शेख यांचा गौरव



● माणगाव तालुक्यातील कृषीवलचे प्रतिनिधी ज्येष्ठ पत्रकार सलीम शेख यांचा कृषीवलच्या ९० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सल्लागार संपादक प्रसाद केरकर यांच्या हस्ते विशेष पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यावेळी कृषीवलच्या कार्यकारी संपादक माधवी सावंत, पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

## जयंती महोत्सव उत्साहात साजरा

। वावोशी । प्रतिनिधी ।

उंबर्डे बौद्धवाडी येथे नवोदित सिद्धार्थ मित्र मंडळ व माता यशोधरा महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने तथागत भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती महोत्सव तथा १३५ वा भीमोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण, बुद्धवंदना, जाहीर सभा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि भीमगीतांच्या सादरीकरणाने कार्यक्रमाला रंगत आली. यावेळी प्रमुख वक्ते राजेश गायकवाड यांनी महापुरुषांचे विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.

## नळ योजनेच्या खोदकामामुळे शेतकऱ्यांची अडचण

### तळवली ग्रामस्थांचे लेखी निवेदन



। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

तळवली गावातील जीवन प्राधिकरण नळ योजनेच्या कामामुळे शेतकऱ्यांसमोर मोठी समस्या निर्माण झाली आहे. गावाबाहेरील शेतजमिनींकडे जाणारा रस्ता सुमारे दोन महिन्यांपूर्वी खोदण्यात आला असून, अद्याप त्या ठिकाणी पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झालेले नाही. परिणामी, शेतकऱ्यांना आपल्या शेतापर्यंत पोहोचणे कठीण झाले असून, शेतीच्या हंगामात त्यांची चिंता वाढली आहे.

सध्या जून महिना सुरू असून, पावसाळी पेरणीची तयारी शेतकरी करत आहेत. मात्र रस्ता खोदून ठेवण्यात आल्याने बैलजोडी, नांगर तसेच इतर यांत्रिक शेती अवजारे शेतापर्यंत नेणे शक्य होत नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. त्यामुळे शेतीची कामे रखडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या संदर्भात तलवली येथील ग्रामस्थांनी एकत्र येत ग्रुप ग्रामपंचायत वडगाव यांना लेखी निवेदन सादर केले आहे. निवेदनात खोदकाम केलेल्या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी अथवा पाईपलाईनचे काम पूर्ण करून शेतकऱ्यांना मार्ग मोकळा करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तळवली गावात जीवन प्राधिकरणाच्या नळ योजनेसाठी करण्यात आलेले खोदकाम अपूर्ण अवस्थेत असल्याने शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे. याबाबत संबंधित कंत्राटदाराला दोन दिवसांत खोदलेला रस्ता भराव करून शेतकऱ्यांसाठी मार्ग मोकळा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, असे खालापूर प्रशासक विनोद चांदोरकर यांनी सांगितले.

> “जीवन प्राधिकरण योजनेसाठी शेताकडे जाणारा रस्ता खोदण्यात आल्याने शेतीची यंत्रसामग्री व बैलजोडी शेतात नेण्यास अडचणी निर्माण होत आहेत. पावसाळ्याच्या तोंडावर शेतीच्या कामांची लगबग वाढली असून, वेळेत कामे न झाल्यास पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित कंत्राटदाराने तातडीने खोदकाम केलेला मार्ग भरून शेतकऱ्यांसाठी रस्ता मोकळा करून द्यावा,
> – भरत मालकर,
> शेतकरी तळवली”

## शिक्षकांच्या हितासाठी सदैव पाठीशी : माजी आ. बाळाराम पाटील

। पनवेल । प्रतिनिधी ।

शिक्षकांच्या हितासाठी राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघटना अखंड पाठीशी राहील, असे कोकण शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी सांगितले. ते राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे पहिले राज्यस्तरीय अधिवेशन व पुरस्कार प्रदान सोहळ्यात दि. ५ जून रोजी व्ही.के. हायस्कूल पनवेल येथे बोलत होते.



कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्षपदी माजी शिक्षक आमदार तथा संघटनेचे संस्थापक मार्गदर्शक बाळाराम पाटील, तर अध्यक्ष स्थानी संघटनेचे राज्याध्यक्ष अनिल नाचपल्ले हे होते. प्रमुख उपस्थितांमध्ये लोहारा/उमरगा मतदार संघाचे विधानसभा सदस्य आमदार प्रवीण स्वामी, पुणे विभाग शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार दत्तात्रय सावंत यांच्यासह संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले, सरचिटणीस संतोष भोजने, उपाध्यक्ष सुखदेव भालेकर, राजेंद्र खैरनार, संपर्कप्रमुख मंगेश सुवर्णकार, धनाजी घरत, लहू राक्षे, जिल्हाध्यक्ष धनाजी घरत, राजन पाटील, राज्यसंघटक प्रशांत शेवाळे, रेखा सुडे, विनया जाधव, लीना मगर, संदीप गीते, विजयकुमार तेलंग यांच्यासह सर्व जिल्हाध्यक्ष तसेच राज्यभरातील विभागीय, जिल्हा व तालुका पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी राज्यातील आदर्श व गुणवंत शिक्षिका शिक्षक यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार, क्रांतीसूर्य महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार, डॉ. पंजाबराव देशमुख ओबीसीरत्न पुरस्कार अशा तीन पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

## माथेरानमध्ये यंदापासून प्लास्टिक रेनकोट बंदी



। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरानमधील जंगल आणि पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी यंदाच्या पावसाळ्यापासून यूज अँड थ्रो स्वरूपातील प्लास्टिक रेनकोटवर बंदी घालण्याचा निर्णय माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेकडून कायम ठेवण्यात आला आहे. या निर्णयाला व्यापारी वर्गानेही सहकार्य करण्याची भूमिका घेतली आहे.

पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक माथेरानमध्ये येतात. वापरून फेकून दिले जाणारे प्लास्टिक रेनकोट जंगलात व रस्त्यांवर पडून राहिल्याने शहराचे विद्रूपीकरण होत असल्याचे पालिकेच्या निदर्शनास आले होते. यामुळे पर्यटन व नियोजन समितीचे सभापती शिवाजी शिंदे यांनी रेनकोट बंदीचा प्रस्ताव मांडला होता, तर नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी त्यास मंजुरी दिली.

नगरपरिषदेत झालेल्या बैठकीत उपनगराध्यक्ष संतोष शेलार, मुख्याधिकारी राहुल इंगळे, सर्व नगरसेवक आणि व्यापारी मंडळाचे अध्यक्ष राजेश चौधरी उपस्थित होते.

## श्रीवर्धन धरणातील गाळउपसा कामावर संशयाचे सावट

### टेकड्या तोडून माती उत्खनन केल्याचा आरोप

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रमुख स्रोत असलेल्या रानवली धरण परिसरात सुरू असलेल्या गाळ उपसा कामावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गाळ काढण्याच्या नावाखाली धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील नैसर्गिक टेकड्या आणि उंचवटे तोडून मोठ्या प्रमाणात माती उत्खनन करण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिक, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे.



स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, धरणातील गाळ काढण्यासाठी कंत्राट मंजूर करण्यात आले असले तरी प्रत्यक्षात मोठ्या यंत्रसामग्रीच्या सहाय्याने मातीचा उपसा करण्यात आल्याचा दावा केला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून मोठ्या क्षमतेच्या डंपरद्वारे ही माती धरण परिसरातून बाहेर नेण्यात आल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.

गेल्या पंधरा दिवसांत परिसरात मोठ्या प्रमाणात डंपरची वाहतूक झाल्याचे स्थानिकांनी निदर्शनास आणले आहे. दहा चाकी डंपरच्या वहनक्षमतेचा विचार करता हजारो टन माती परिसरातून हलविण्यात आल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यासाठी आवश्यक शासकीय परवानग्या घेण्यात आल्या होत्या का, तसेच नियमानुसार रॉयल्टी भरली गेली होती का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.

संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करण्यात यावी, काढण्यात आलेल्या गाळ अथवा मातीचे अधिकृत मोजमाप जाहीर करण्यात यावे, तसेच पाटबंधारे विभाग, महसूल विभाग, स्थानिक नागरिक, पत्रकार आणि सामाजिक प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत संयुक्त पाहणी करण्यात यावी, अशी मागणी होत आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात यंत्रसामुग्री व डंपरची वाहतूक सुरू असताना संबंधित विभागांनी नियमित देखरेख केली होती का, याबाबतही नागरिकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करण्यात येईल, असा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

**बांधकाम विभागाच्या कारभारावर ताशेरे** | **रिक्षाचालकांचे प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात संतप्त आंदोलन**

# भोगावती पुलावर उभारला बांबूचा कठडा

। पेण । प्रतिनिधी ।

पेण शहरातील भोगावती पुलावरील जीवघेण्या परिस्थितीकडे प्रशासनाने केलेल्या अक्षम्य दुर्लक्षाचा संताप अखेर रिक्षाचालकांच्या आंदोलनातून उफाळून आला आहे. नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या यंत्रणा झोपेचे सोंग घेत असताना, तीन चाकी चालक-मालक संघटना, चावडी नाका, पेण यांनी पुढाकार घेत पुलावर स्वतः बांबूचा तात्पुरता संरक्षण कठडा उभारून शासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभारावर जोरदार चपराक लगावली.




विशेष म्हणजे, हा कठडा उभारण्यासाठी वापरण्यात आलेले बांबू हे अंत्यविधीसाठी वापरले जाणारे बांबू होते. जिवंत नागरिकांचे प्राण वाचवण्यासाठी शासनाकडे निधी, यंत्रणा किंवा इच्छाशक्ती नसल्याने मृतांच्या अंत्यसंस्कारासाठी वापरले जाणारे बांबू आणून नागरिकांनाच संरक्षण उभारावे लागत आहे, यापेक्षा प्रशासनाच्या अपयशाचे मोठे उदाहरण कोणते, असा संतप्त सवाल रिक्षाचालकांनी उपस्थित केला.

गेल्या ६ मे रोजी याच पुलावर एका रिक्षाचालकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. पुलावरील खड्डा चुकविण्याच्या प्रयत्नात रिक्षा नियंत्रणाबाहेर जाऊन थेट नदीत कोसळली. कारण पुलाला संरक्षण कठडाच नव्हता. एका निष्पाप नागरिकाचा बळी गेल्यानंतर तरी प्रशासनाला जाग येईल, अशी अपेक्षा होती. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाने केवळ खड्डे बुजविण्याची दिखाऊ कार्यवाही करून आपली जबाबदारी झटकली. अपघाताचे मूळ कारण असलेल्या संरक्षण कठड्याबाबत मात्र कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत.

लाखो-कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांच्या घोषणा करणारे शासन आणि प्रशासन एका पुलावर साधा संरक्षण कठडा उभारू शकत नसेल, तर हा विकास नेमका कोणासाठी, असा प्रश्न आता नागरिक विचारू लागले आहेत. जीवितहानी झाल्यानंतरही अधिकाऱ्यांची संवेदनशीलता जागी होत नसेल, तर ती केवळ निष्काळजीपणा नसून नागरिकांच्या जीवाशी खेळण्यासारखी बाब असल्याची टीका यावेळी करण्यात आली.

रिक्षाचालकांनी उभारलेला बांबूचा कठडा हा केवळ तात्पुरता सुरक्षेचा उपाय नाही, तर तो प्रशासनाच्या बेजबाबदार आणि उदासीन कारभाराविरोधातील तीव्र निषेधाचे प्रतीक बनला आहे. आणखी किती बळी गेल्यानंतर प्रशासनाला जाग येणार? आणखी किती कुटुंबे उद्ध्वस्त झाल्यानंतर अधिकारी फाईलीतून बाहेर पडणार? असे संतप्त प्रश्न यावेळी उपस्थित करण्यात आले. भोगावती पुलावर कायमस्वरूपी आणि मजबूत संरक्षण कठडा तातडीने उभारण्यात यावा, अन्यथा तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा तीन चाकी चालक-मालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

### अपघात घडल्यास जबाबदार कोण?

नागरिकांच्या सुरक्षेसाठी शासनाने करावयाचे काम अखेर रिक्षाचालकांना स्वतःच्या खर्चाने आणि पुढाकाराने करावे लागत असल्याचे विदारक चित्र पेणमध्ये पाहायला मिळत असून, यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी असणाऱ्या संबंधित प्रशासनाला गांभीर्य नसल्याने संताप व्यक्त करण्यात आला.

## मुंढे आणि त्यांच्या कारवाया

अन्न आणि औषध प्रशासन विभागातून तुकाराम मुंढे यांची अजून बदली झालेली नाही हेच मोठे आश्चर्य आहे. मुंढे जिथे जातात तिथे ते धाडी घालायला, कारवाई करायला सुरुवात करतात. अन्न आणि औषध प्रशासनामध्ये आयुक्त म्हणून आल्यावर असंख्य कारखानदार, हॉटेलवाले, खाद्यपदार्थांचे दुकानदार, औषध धंदेवाले त्यांच्या तडाख्यात सापडणार हे उघड होते. त्यानुसार पहिल्या सहा दिवसात २०३ धाडी पडल्या आणि सुमारे १०२ जणांना अटक झाली. त्यांनी ६८ हॉटेल्स आणि दुकाने बंद केली. वर्ध्याचा विनोबा आश्रमाशी संबंध असलेला गोरस पाक विक्रीचा व्यवसायही त्यांच्या कचाट्यात सापडला. पुण्यात विषारी दारुचे बळी गेले. त्या दारुत मिथेनॉल मिसळलेले आढळले. मुंढे यांनी भिवंडीच्या गोदामांवर धाडी टाकल्या. मिथेनॉल तर जप्त केलेच. शिवाय इतर रसायनेही पकडली. कोणत्याही खात्यात लोकांच्या भल्याचे नियम केलेले असतातच. मुद्दा असतो त्यांच्या अंमलबजावणीचा. मिथेनॉलच्या प्रकरणात असे आढळले की, त्याचा उपयोग कशासाठी होणार आहे याची खातरजमा त्याच्या उत्पादकाने किंवा साठवणूक करणाऱ्याने करायची असते. रेक्स इंटरनॅशनल या उत्पादक कंपनीने ती केलेली नव्हती. किंवा जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले होते. आपल्याकडे असेच सगळे व्यवहार चालतात. काही वेळेला यात विश्वासाचा किंवा परस्पर भरवशाचाही भाग असतो. वर्षानुवर्षे गोष्टी बिनबोभाट चालत असतात. एकदा कधीतरी अपघात होतो आणि सर्व बेकायदा किंवा नियमांना सोडून केल्या जाणाऱ्या गोष्टी उघड होतात. विषारी दारु दुर्घटनेसारख्या प्रकरणात कमी खर्चात प्रचंड नफा मिळवण्याची लालूच प्रभावी ठरते. याबाबत सरकारी यंत्रणा आणि उद्योगधंदेवाले यांचा उंदीरमांजराचा खेळ चालू असतो. मिथेनॉल मिसळून दारुचे बळी जाण्याचे प्रमाण वाढल्याने सरकारने मिथेनॉलमध्ये कडू चव आणि वेगळा रंग मिसळण्याची एक अधिसूचना काढली होती. २०११ सालच्या या अधिसूचनेवर २०१९ मध्ये उच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले होते. पण उत्पादकांनी हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात नेले व तिथे याला स्थगिती दिली गेली. ती स्थगिती मागे घेऊन अधिसूचना कायम ठेवण्यासाठी विशेष अनुमती मागणारी एक याचिका दाखल केली जाणार आहे. त्यासाठी पुणे दारुकांडाचा दाखला दिला जाईल.

### नियम असतातच, पण...

आणखी एका कारवाईमध्येही मुंढे यांनी यापूर्वीच अस्तित्वात असलेल्या नियमाची अंमलबजावणी सुरू केली आहे. एफएसएसएआय ही अन्न सुरक्षा व मानके यामधील देशातील सर्वोच्च संस्था आहे. कोणत्याही खाद्यपदार्थांच्या पाकिटावर या संस्थेचा शिक्का असेल तर तो सुरक्षित मानला जातो. पूर्वी आयएसआय या शिक्क्याबाबत लोकांना जो भरवसा होता तो आता या संस्थेबाबत निर्माण झाला आहे. या संस्थेने २०१९ मध्ये एक नियम लागू केला. त्यानुसार खाद्यपदार्थ पॅक करण्यासाठी किंवा तळलेल्या पदार्थांचे तेल सुकवण्यासाठी वर्तमानपत्रांचा कागद देण्यावर बंदी घालण्यात आली. जिलबी, वडे, समोसे, भजी वगैरे देण्यासाठी स्टॉलवाली मंडळी सर्रास वृत्तपत्राचा कागद प्लेटसारखा वापरतात. पण वृत्तपत्र छापण्यासाठी जी शाई वापरली जाते त्यात शिसे, जस्त, कॅडमियम यासारखे जड धातू असतात. जिलेबीचा पाक किंवा वड्याचे उष्ण तेल यामुळे ही शाई वितळते व या पदार्थात हे जड आणि विषारी धातू मिसळतात. यातून कर्करोग, यकृताचे आजार होण्याचा धोका असतो. त्यामुळे देशभर या कागदाच्या वापरावर बंदी घालण्यात आली. पण आपल्याकडच्या अनेक सरकारी कायद्यांप्रमाणे हा नियम व ही बंदीदेखील कागदावरच राहिली. आता मुंढे यांनी या नियमाची कडक अंमलबजावणी सुरु केली आहे. दुर्दैवाने असे नियम व अशा बंदी या आपल्याकडे कागदावरच राहतात. अनेकदा सरकारी अधिकारी त्यांच्याकडे पैसे उकळण्याचे साधन म्हणून पाहतात. मुंढे यांचे अर्थातच तसे नाही. सरकारचे असे अनेक नियम वर्षानुवर्षे फायलींमध्ये पडून असतात. ते अंमलात आणले तरी मोठा बदल सुरु होतो असे त्यांच्यासारख्या अधिकाऱ्यांना वाटते. त्यामुळे ते कोणत्याही खात्यात गेले तरी तिथे अशा धडाकेबाज कारवाया सुरु करतात. त्यांच्या बातम्या होतात व त्यांना प्रसिद्धी मिळते. पण या कारवायांमुळे कोणाच्या तरी शेपटीवर पाय दिले जातात. त्यांच्याविरुद्ध तक्रारी सुरू होतात. मग त्यांची बदली होते. त्याचीही बातमी होते.

### इकडेही नजर वळवा

सोलापूरचे जिल्हाधिकारी होते तेव्हा त्यांनी टँकर लॉबीचा बंदोबस्त केला. ऐन उन्हाळ्यात व दुष्काळामध्ये टँकरची संख्या कमी राहील असे नियोजन केले. त्यासाठी बनावट टँकर फेऱ्या दाखवून पैसे लाटणाऱ्यांना चाप लावला. पुणे परिवहनचे प्रमुख असताना त्यांनी बससाठीच्या खरेदीचा लेखाजोखा तपासायला सुरुवात केली. दुसरीकडे कामचुकार कर्मचाऱ्यांवर कारवाईला सुरुवात केली. आता अन्न आणि औषध प्रशासनामध्ये तर त्यांच्या अशा धडाकेबाजपणाला खूपच वाव आहे. यापूर्वी महेश झगडे हे या विभागाच्या आयुक्तपदी असताना त्यांनी बड्या औषध कंपन्यांशी पंगा घेतला होता. जॉन्सन कंपनीसोबतचा त्यांचा वाद तर देशभर गाजला होता. त्या कंपनींच्या लहान मुलांसाठी वापरल्या जाणाऱ्या पावडरवर किंवा काही उत्पादनांवर अमेरिकेसह अनेक देशांमध्ये बंदी आहे. पण भारतात त्यांचे वितरण चालू होते. या उत्पादनांमुळे कर्करोग किंवा अन्य गंभीर आजार होत असल्याचे आढळले होते. त्यातून आधी झगडे व नंतर इतर काही अधिकाऱ्यांनी या कंपनीवर कारवाई केली होती. या कंपनीचा उत्पादन परवानाही काही काळासाठी रद्द करण्यात आला होता. नंतर उच्च न्यायालयाने हा निर्णय फिरवायला भाग पाडले असले तरी अन्न आणि औषध प्रशासन काय करू शकते याची ती चुणूक होती. मुंढे यांनी आता दुधाच्या विरोधात मोहीम उघडल्याच्या बातम्या आहेत. महाराष्ट्रात दुधाची क्रांती झाल्याचे डिंडिम पिटले जात असतात. पण आपल्याकडच्या गायी-म्हशींची संख्या आणि निर्माण होणारे दूध यांचे प्रमाण व्यस्त आहे. याचाच अर्थ दुधात युरियाचे पाणी किंवा नुसते पाणी किंवा अन्य द्रवपदार्थ मिसळल्याखेरीज इतक्या मोठ्या प्रमाणात दूध विक्रीसाठी उपलब्ध होणे शक्य नाही. हेच ओळखून मुंढे यांनी साफसफाई हाती घेतली आहे. तिला फडणवीस सरकारने पाठिंबा द्यायला हवा. दूध हा आपल्या बहुसंख्य कुटुंबाच्या आहाराचा भाग आहे. विशेषतः लहान मुलांना दूध दिले जात असते. त्यांच्यावर या भेसळयुक्त दुधाचा विपरीत परिणाम होऊ शकतो. हे भयंकर परिणाम कदाचित पुढच्या काळात उघडकीस येतील. पण तोवर उशीर झालेला असेल. एक पिढी कोणत्या ना कोणत्या दुखण्यांची बळी ठरेल. याच रीतीने मुंढे यांनी आपल्याकडच्या हॉटेले व खाद्यपदार्थांची दुकाने यावरही कारवाई करण्याची गरज आहे. आपल्याकडे मिळणारे पनीर हे सरसकट भेसळीचे असते असे म्हटले जाते. शिवाय बहुतांश ठिकाणी खाद्यपदार्थ बनवण्यासाठी पामतेलाचा वापर केला जातो. हे तेल भेसळयुक्त असते. बटर वा चीज या नावाने जे काही खपवले जाते तेही बनावट असते. मुंढे यांनी या सर्वांवर कारवाई केली व तोवर त्यांना इथे राहू दिले गेले तर ते बरे होईल.

विचार

# हरित ऊर्जेसाठी उपयुक्त संशोधन

***हवामानबदल, वाढते तापमान, जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व यामुळे पर्यावरणावरील संकट दिवसेंदिवस गंभीर होत आहे. अशा वेळी 'ग्रीन हायड्रोजन'चा पर्याय जगभर चर्चेत आला. भारतानेही २०३० पर्यंत दर वर्षी ५० लाख टन 'ग्रीन हायड्रोजन' उत्पादनाचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य ठेवले आहे. या पार्श्वभूमीवर आयआयटी गुवाहाटीच्या वैज्ञानिकांनी विकसित केलेली नवी कोटिंग तंत्रज्ञान प्रणाली ही महत्त्वाची घडामोड मानावी लागेल.***



**मिलिंद बेंडाळे**

भारतात ऊर्जा, पर्यावरण आणि विकास या तिन्ही विषयांशी संबंधित प्रश्नांचा संगम ज्या एका विषयात दिसतो, तो म्हणजे 'ग्रीन हायड्रोजन'. काही वर्षांपूर्वीपर्यंत हा विषय केवळ वैज्ञानिक परिषदांपुरता मर्यादित होता; परंतु आज तो जागतिक राजकारण, अर्थकारण आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या चर्चेच्या केंद्रस्थानी पोहोचला आहे. अशा वेळी 'आयआयटी' गुवाहाटीच्या वैज्ञानिकांनी विकसित केलेल्या नव्या तंत्रज्ञानाने संशोधन क्षेत्रातच नव्हे, तर भारताच्या ऊर्जा भविष्याबाबतही नव्या आशा निर्माण केल्या आहेत. पाण्यापासून स्वच्छ हायड्रोजन तयार करण्याची प्रक्रिया अधिक वेगवान, टिकाऊ आणि परिणामकारक बनवणे, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून संशोधन करण्यात आले. साध्या भाषेत सांगायचे, तर सूर्यप्रकाश आणि पाणी यांच्या साहाय्याने स्वच्छ इंधन तयार करण्याच्या दिशेने भारताने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. हे केवळ तांत्रिक प्रगतीचे उदाहरण नाही, तर भविष्यातील ऊर्जा राजकारणात भारताला स्वतंत्र ओळख मिळवून देणारी शक्यता आहे. आज जग ऊर्जा संकटाच्या नव्या टप्प्यावर उभे आहे. गेल्या दोन शतकांपासून औद्योगिक विकासाचा पाया कोळसा, तेल आणि नैसर्गिक वायू यांसारख्या जीवाश्म इंधनांवर उभा राहिला; परंतु या इंधनांनी जगाला विकास दिला, तितकाच पर्यावरणीय संकटाचाही वारसा दिला. हवामानबदल, वाढते तापमान, वितळणारे हिमनग, दुष्काळ, अतिवृष्टी आणि समुद्राची वाढती पातळी हे सारे परिणाम आता प्रत्यक्ष जाणवू लागले आहेत. याच कारणामुळे जग स्वच्छ ऊर्जेकडे वळत आहे.

सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, विद्युत वाहने आणि हरित हायड्रोजन हे नव्या ऊर्जा व्यवस्थेचे प्रमुख आधारस्तंभ मानले जात आहेत. यात हरित हायड्रोजनला विशेष महत्त्व दिले जात आहे, कारण ते दीर्घकालीन ऊर्जा साठवण, जड उद्योग आणि वाहतूक क्षेत्रासाठी प्रभावी पर्याय ठरू शकते. भारतासाठी हा विषय अधिक महत्त्वाचा आहे. कारण भारत जगातील सर्वात मोठ्या ऊर्जा ग्राहकांपैकी एक आहे. देशाची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे आणि त्याच वेगाने ऊर्जा गरजाही वाढत आहेत. आज भारत आपल्या तेलाच्या गरजांसाठी आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर आंतरराष्ट्रीय बाजारातील तेलाच्या किंमतीतील चढउतारांचा थेट परिणाम होतो. रशिया-युक्रेन युद्धानंतर जगाने ऊर्जा सुरक्षेचे महत्त्व नव्याने अनुभवले. तेल आणि गॅसच्या पुरवठ्यावर अवलंबून राहण्याचे धोके स्पष्ट झाले. त्यामुळे अनेक देशांनी स्वदेशी आणि स्वच्छ ऊर्जा स्रोतांकडे लक्ष केंद्रित केले. भारतासाठी 'ग्रीन हायड्रोजन' हे त्याच धोरणात्मक बदलाचे प्रतीक आहे. 'आयआयटी' गुवाहाटीच्या संशोधनाचे महत्त्व इथेच वाढते. कारण ग्रीन हायड्रोजनची सर्वात मोठी समस्या म्हणजे त्याच्या उत्पादनाचा खर्च आणि कार्यक्षमता. आज उपलब्ध तंत्रज्ञान महागडे आहे आणि मोठ्या प्रमाणावर उत्पादनासाठी पुरेसे कार्यक्षम नाही. त्यामुळे ग्रीन हायड्रोजन अजूनही पारंपरिक इंधनांशी स्पर्धा करू शकत नाही. गुवाहाटीतील वैज्ञानिकांनी विकसित केलेली नवी कोटिंग प्रणाली या समस्येवर उपाय शोधण्याचा प्रयत्न करते.

आयआयटी गुवाहाटीच्या वैज्ञानिकांनी अशी रचना तयार केली आहे, ज्यामुळे पाण्याचे विघटन अधिक प्रभावी पद्धतीने होते. विशेषतः प्रक्रियेदरम्यान निर्माण होणारे गॅस बुडबुडे इलेक्ट्रोडवर चिकटून राहू नयेत, यासाठी त्यांनी विशेष हायड्रोजेल थर विकसित केला आहे. त्यामुळे प्रक्रिया अधिक वेगाने आणि सातत्याने चालते. याचा अर्थ कमी वेळेत अधिक हायड्रोजन तयार होऊ शकतो. म्हणजेच उत्पादनाचा खर्च कमी होण्याची शक्यता वाढते. हे तंत्रज्ञान पुढे व्यावसायिक पातळीवर यशस्वी झाल्यास ग्रीन हायड्रोजन अधिक व्यवहार्य बनू शकते; परंतु या संशोधनाचे महत्त्व केवळ ऊर्जा उत्पादनापुरते मर्यादित नाही. त्यातून भारतातील संशोधन व्यवस्थेची क्षमतादेखील अधोरेखित होते. अनेकदा भारतावर 'तंत्रज्ञान आयात करणारा देश' अशी टीका केली जाते; परंतु अंतराळ, औषधनिर्मिती, डिजिटल तंत्रज्ञान आणि जैवतंत्रज्ञानाप्रमाणेच ऊर्जा क्षेत्रातही भारतीय संशोधन संस्था महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, हे या संशोधनातून स्पष्ट होते. एक महत्त्वाचा प्रश्न मात्र येथे उपस्थित होतो, तो म्हणजे भारत संशोधनाला पुरेसे प्राधान्य देतो का? विकसित देशांच्या तुलनेत भारताचे संशोधनावरील खर्चाचे प्रमाण अजूनही कमी आहे. विद्यापीठे आणि संशोधन संस्थांमध्ये उत्कृष्ट प्रतिभा असूनही निधी, पायाभूत सुविधा आणि उद्योगांशी समन्वय या बाबतीत मर्यादा आहेत. अनेक संशोधन प्रकल्प प्रयोगशाळेपलीकडे जाऊ शकत नाहीत. 'ग्रीन हायड्रोजन'सारख्या क्षेत्रात ही दरी कमी करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण हे तंत्रज्ञान भविष्यातील अर्थव्यवस्थेचा पाया बनू शकते.

भविष्यात स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञान असणारे देशच जागतिक स्पर्धेत पुढे राहतील. त्यामुळे संशोधनाकडे केवळ शैक्षणिक उपलब्धी म्हणून न पाहता, राष्ट्रीय गुंतवणूक म्हणून पाहिले पाहिजे. भारत सरकारने राष्ट्रीय हरित हायड्रोजन अभियान सुरू करून योग्य दिशेने पाऊल टाकले आहे; परंतु हे अभियान यशस्वी होण्यासाठी संशोधन, उद्योग आणि धोरण या तिन्ही घटकांमध्ये समन्वय आवश्यक आहे. उद्योगक्षेत्राने संशोधन संस्थांशी अधिक जवळून काम केले पाहिजे. तसेच सरकारने दीर्घकालीन गुंतवणूक आणि धोरणात्मक स्थिरता दिली पाहिजे. 'ग्रीन हायड्रोजन'चे आणखी एक महत्त्वाचे अंग म्हणजे ग्रामीण आणि विकेंद्रित ऊर्जा व्यवस्था. भारतातील अनेक भाग अजूनही स्थिर आणि स्वच्छ ऊर्जा पुरवठ्यापासून वंचित आहेत. भविष्यात लहान प्रमाणावर 'ग्रीन हायड्रोजन' उत्पादन शक्य झाले, तर ग्रामीण भागात ऊर्जा स्वावलंबनाचे नवे मॉडेल तयार होऊ शकते. शेतकरी, लघुउद्योग आणि दुर्गम भागांसाठी ही मोठी क्रांती ठरू शकते. याचबरोबर 'ग्रीन हायड्रोजन' भारताच्या औद्योगिक धोरणालाही नवी दिशा देऊ शकते. स्टील, सिमेंट, खत आणि रसायन उद्योग हे कार्बन उत्सर्जनाचे मोठे स्रोत आहेत. या क्षेत्रांमध्ये ग्रीन हायड्रोजनचा वापर वाढवल्यास भारत औद्योगिक विकास आणि पर्यावरणीय जबाबदारी यांचा समतोल साधू शकतो; मात्र या सर्व शक्यतांसोबत काही कठोर वास्तवही आहेत.

'ग्रीन हायड्रोजन'साठी मोठ्या प्रमाणावर स्वच्छ वीज आणि पाण्याची आवश्यकता असते. भारतासारख्या देशात पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. त्यामुळे ऊर्जा संक्रमण करताना संसाधनांचा समतोल वापर महत्त्वाचा ठरणार आहे. तसेच तंत्रज्ञानाची किंमत कमी करणे हे सर्वात मोठे आव्हान राहणार आहे; पण इतिहास सांगतो, की सुरुवातीला महाग वाटणारे तंत्रज्ञान पुढे जाऊन सर्वसामान्य बनते. सौर ऊर्जेचे उदाहरण समोर आहे. काही वर्षांपूर्वी सौर ऊर्जा अत्यंत महाग मानली जात होती. आज ती अनेक ठिकाणी सर्वात स्वस्त ऊर्जा स्रोत ठरत आहे. 'ग्रीन हायड्रोजन'बाबतही अशीच शक्यता आहे. यासाठी दीर्घकालीन दृष्टी आवश्यक आहे. ऊर्जा संक्रमण ही एका दिवसात घडणारी प्रक्रिया नाही. ती दशकांमध्ये आकार घेते. भारताने आजपासूनच संशोधन, पायाभूत सुविधा आणि कौशल्य विकास यांवर लक्ष केंद्रित केल्यास पुढील दोन-तीन दशकांमध्ये तो 'ग्रीन हायड्रोजन' क्षेत्रात जागतिक नेतृत्व मिळवू शकतो. 'आयआयटी' गुवाहाटीचे संशोधन या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे. हे संशोधन भारताला केवळ स्वच्छ ऊर्जा देणार नाही, तर नव्या आर्थिक संधी, औद्योगिक प्रगती आणि तंत्रज्ञानातील आत्मनिर्भरता यांचाही मार्ग मोकळा करू शकते. आजच्या काळात ऊर्जा हा केवळ आर्थिक प्रश्न राहिलेला नाही. तो राष्ट्रीय सुरक्षेशीही जोडला गेला आहे. ऊर्जा स्रोतांवर नियंत्रण असणारे देशच जागतिक राजकारणात प्रभावी ठरतील. त्यामुळे 'ग्रीन हायड्रोजन'मध्ये गुंतवणूक करणे म्हणजे भविष्यातील सामरिक शक्तीत गुंतवणूक करणे होय.

चर्चा आजची

# शिवसागराच्या सुरक्षेसह आरोग्यासाठी



**प्रमोद जाधव**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५२ व्या शिवराज्यभिषेक दिनानिमित्त रायगड भगवामय झाला होता. मंत्रोच्चार, पालखी सोहळा, सुवर्णमुद्रांचा अभिषेक, जय भवानी, जय शिवाजी च्या जयघोषाने दुमदुमून गेला. शिवभक्तांच्या उत्साहाने आणि स्वराज्याच्या अभिमाने संपुर्ण गड भक्तीमय झाला होता. लाखो शिवभक्त गडावर दाखल झाले होते. कडक उन्हाचे चटके असतानाही त्यावर मात करीत अनेक शिवभक्त महाराजांच्या दर्शनासाठी गडावर आले होते. या शिवसागराच्या सुरक्षेसाठी आणि त्यांच्या आरोग्यासाठी रायगड पोलिसांनी आणि आरोग्य विभागाने कंबर कसली.

मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या भव्य सोहळ्यासाठी राज्याच्या कानोकोपऱ्यातून आणि देशभरातून लाखो शिवप्रेमींनी उपस्थिती लावली होती. छत्रपती शिवाजी महाराजांना सामुहिक अभिवादन करण्यात आले. पोलिसांकडून मानवंदना देण्यात आली. पारंपारिक ढोल- ताशे, लेझीम, मर्दानी खेळ, भगव्या पताकांनी सजलेल्या मिरवणुकीने शिवभक्तांमध्ये एक वेगळा उत्साह निर्माण झाला होता. पोवाडे, किर्तन, शिवचरित्रावरील व्याख्याने, लोककलांचे सादरीकरण करण्यात आले. पारंपारिक वेशभुषेतील युवक - युवती, मावळे, आणि विविध सामाजिक संस्थाच्या सहभागामुळे संपुर्ण रायगड परिसर शिवकालीन वातावरणाने बहरला होता. जिल्हा प्रशासनाकडून व्यापक नियोजन केले होते. मोफत बससेवा, अन्नछत्र, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्यभिषेक सोहळा ६ जूनला साजरा झाला. महाड येथील रायगडावर होणाऱ्या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनासह आरोग्य प्रशासनाने सुरक्षेसह आरोग्याच्या दृष्टीने कंबर कसली. गडाच्या टोकापासून पायथ्यापर्यंत तसेच महामार्गावर ठिकठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त तैनात केला होता. रायगड, रत्नागिरी, ठाणे ग्रामीण अशा वेगवेगळ्या जिल्ह्यातून पोलीस मागविण्यात आलेहोते. दीड हजार पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. भक्तांचा प्रवास सुखकर व्हावा, यासाठी या मार्गावर वाहतूक पोलीस तैनात केले होते. वाहन पार्कींगची व्यवस्था करण्यात आली होती. ७५ हून अधिक एसटी बसबरोबरच वेगवेगळ्या खासगी वाहनांने भक्त दाखल झाले होते. त्यांना निश्‍चित स्थळी लवकर पोहचता यावा, वाहतूक कोंडीचा फटका बसू नये म्हणून रायगड पोलिसांनी योग्य नियोजन केले होते. महाड आणि माणगाव या दोन्ही बाजूला वाहन पार्कींगची व्यवस्था करण्यात आली होती. सीआरपीएफ जवानांसह शिघ्रकृती दल आदी सुरक्षा यंत्रणा ठिकठिकाणी तैनात केली होती. दुचाकी, चार चाकी आणि बस यांची वेगवेगळी पार्कींग केली होती. यासाठी साठहून अधिक वाहतूक पोलिसांची नेमणूक केली होती. सध्या मोठ्या प्रमाणात उन्हाचा तडाखा जाणवत होता. नागरिकांना उष्माघात, चक्कर येणे, थकवा जाणवणे अशा प्रकारच्या आरोग्याच्या समस्या जाणवण्याची शक्यता होती. त्यामुळे किल्ले रायगडावर येणाऱ्या शिवभक्तांच्या सोयीसाठी जिल्हा परिषद आणि जिल्हा सामान्य रुग्णालय या आरोग्य विभागाने गडावर आणि पायथ्याशी विशेष वैद्यकीय पथके, २४७ रुग्णवाहिका आणि मुबलक औषधसाठ्यासह सज्जता ठेवली होती. शिवराज्याभिषेक सोहळ्यादरम्यान दोन दिवस एकूण १३ विशेष वैद्यकीय पथके पुरविण्यात आली होती.

रायगड व परिसरात आरोग्य विभागाने वैद्यकीय पथके, गडावरील विविध पॉईंट्स आणि पाचाड येथील राजमाता जिजाऊ समाधी परिसराजवळ तात्पुरती वैद्यकीय मदत केंद्रे उभारण्यात होती. उन्हाचा त्रास, थकवा, चक्कर येणे, पाय घसरून होणाऱ्या किरकोळ दुखापती यावर औषधोपचार करण्यासाठी सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये जीवनरक्षक औषधे व लस उपलब्ध ठेवण्यात आल होत्या. आपत्कालीन परिस्थितीसाठी गडाच्या पायथ्याशी व परिसरातील प्रमुख मार्गांवर २४ तास रुग्णवाहिका तैनात केल्या होत्या. सोहळ्यादरम्यान निर्माण होणाऱ्या कोणत्याही आरोग्याच्या समस्येवर त्वरित उपचारासाठी डॉक्टर, परिचारिका आणि पॅरामेडिकल स्टाफची नियुक्ती करण्यात आली होती.

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत प्रत्येकी १ वैद्यकीय अधिकारी, १ समुदाय आरोग्य अधिकारी व एक आरोग्यसेवक यांचा समावेश होता. ही पथके कोंझर पार्किंग, वाय जंक्शन, चित्त दरवाजा, चित्त दरवाजा व महादरवाजा दोन्हीच्या मध्ये, महादरवाजा, वालसुरे पार्किंग, पाचाड धर्मशाळा, नाणे दरवाजा, शिवसृष्टी पार्किंग (पाचाड गाव), कवळीचा माळ, मदारी मेहतर ते महादरवाजाच्यामध्ये, प्राथमिक आरोग्य केंद्र पाचाड ओपीडी व राखीव पथक आरोग्य सेवा पुरविण्यासाठी तैनात केली होती.

लोकसंसद

### रेल्वे प्रशासनाचा कौतुकास्पद उपक्रम!

'वाचाल तर वाचाल!' हा मूलमंत्र केवळ चार अक्षरांची ओळख करून देणारा नाही तर माणसाला वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ करणारा एक प्रभावी विचार आहे. मात्र सध्याच्या डिजिटल क्रांतीच्या आणि मोबाईलच्या जमान्यात वाचन संस्कृती लयाला जात असून जो तो मोबाईलच्या आभासी दुनियेत हरवून गेला आहे. आज माणसाच्या हातातील पुस्तकाची जागा मोबाईल स्क्रीन, सोशल मीडिया रिल्स आणि वेब सिरीजनी घेतली आहे. विशेषतः रेल्वे प्रवासात खिडकीबाहेरचे जग न्याहाळत एखादे पुस्तक वाचून प्रवास सुखदायक आणि ज्ञानवर्धक करणारे प्रवासी आता कमीच दिसतात. या पार्श्वभूमीवर, वाचन संस्कृतीला पुन्हा उजाळा आणि संजीवनी देण्यासाठी भारतीय रेल्वे प्रशासन एक अत्यंत दिलासादायक आणि अभिनव उपक्रम राबवत आहे. पश्चिम रेल्वे आणि 'प्रोजेक्ट मुंबई' यांनी संयुक्तपणे मुंबईतील चर्चगेट रेल्वे स्थानकावर देशातील पहिले मोफत 'सार्वजनिक स्टेशन पुस्तकालय' सुरु केले आहे. या वाचनालयाचे उद्घाटन नुकतेच दक्षिण आफ्रिकेचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू एबी डिव्हिलियर्स याच्या हस्ते करण्यात आले. येथील पुस्तके प्रवासी स्थानकावर बसून वाचू शकतील तसेच घरी किंवा प्रवासात वाचण्यासाठी घेऊन जाऊ शकतील. मात्र १४ दिवसांनंतर ती परत करावी लागणार आहेत. हे मोफत पुस्तकालय केवळ 'विश्वास आणि प्रामाणिकपणा' या तत्वांवर चालवले जाणार आहे. पश्चिम रेल्वे प्रशासन 'प्रोजेक्ट मुंबई'च्या माध्यमातून या योजनेचा विस्तार हळूहळू दादर, अंधेरी आणि बोरीवली अशा गर्दीच्या उपनगरीय स्थानकांवरही करणार आहे. मोफत पुस्तकालयाचे रेल्वेने उचललेले हे पाऊल खरोखरच कौतुकास्पद असे आहे.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# भारताच्या पहिल्या महिला आयपीएस किरण बेदी

स्त्री हा शब्द प्रतीक आहे शक्तीचा, सामर्थ्यांचा, संवेदनशीलतेचा. विविध क्षेत्रात आत्मनिर्भरतेचा नवा अध्याय लिहिणारीही स्त्रीच असते. समाजाने आखून दिलेली चौकट ओलांडून आज महिलांनी थेट यशाच्या क्षितिजाला गवसणी घातली आहे. एक निडर, कर्तव्यदक्ष देशाच्या पहिल्या महिला आयपीएस अधिकारी म्हणून किरण बेदींनी आपली कारकीर्द गाजवली होती. त्याबद्दल आजही त्यांचं नाव अदबीनंच घेतलं जातं. एक कठोर पोलिस अधिकारी अशी त्यांनी ख्याती होती. तिहार तुरुंगात अधिकारी असतानाही त्यांनी अनेक योजना यशस्वीपणे राबवून दाखविल्या. किरण बेदी यांनी दिल्ली व्यतिरिक्त गोवा, चंदीगढ आणि मिझोराममध्ये आयपीएस अधिकारी म्हणून काम केले आहे. अमृतसरमध्ये ९ जून १९४९ रोजी जन्म लेल्या किरण बेदी यांनी ड्रग्जच्या विरोधात मोहीम चालवली होती. तिहार तुरुंगाला मॉडेल जेल बनवण्यात त्यांनी योगदान दिले. त्यांनी तुरुंगात कैद्यांना धूम्रपान करण्यास बंदी घातली. विपश्यनेसाठी ध्यान वर्ग घेण्यात आले. तसेच अनेक सामाजिक कार्य त्यांनी केले. अमृतसरच्या गर्व्हनमेंट कॉलेज फॉर वुमन येथून त्यांनी कला शाखेची पदवी घेतली. त्यानंतर चंदिगड येथील पंजाब विद्यापिठातून सोशल सायंसमध्ये मास्टर्स पूर्ण केले. १९८८ मध्ये दिल्ली विद्यापिठातून कायद्याची पदवी घेतली. त्यानंतर सोशल सायंसमध्ये डॉक्टरेट मिळवली. किरण बेदी यांनी अमृतसरच्या खालसा कॉलेज फॉर वुमनमध्ये पॉलिटिकल सायंसच्या लेक्चरर म्हणून नोकरीला सुरवात केली. १९७२ मध्ये त्या पहिल्या महिला आयपीएस अधिकारी झाल्या. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कोणत्याही क्षेत्रात आपले स्थान निर्माण करू शकतात. त्यांची पहिली नेमणूक चाणक्यपुरी उपविभागामध्ये अधिकारी म्हणून झाली. नवव्या आशियायी खेळ स्पर्धेदरम्यान त्यांची वाहतूक पोलीस उपायुक्त म्हणून नेमणून करण्यात आली. त्यांनी क्रेनच्या साहाय्याने अनेक चुकीच्या जागी पार्किंग केलेल्या वाहनांना जप्त केले. या वेळी त्यांना मक्रेन बेदीफ असेही नाव देण्यात आले. पोलिस रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंटमध्ये त्यांनी प्रधान संचालक हे पद भूषविले आहे. डिसेंबर २००७ मध्ये त्यांनी आयपीएसमधून स्वेच्छानिवृत्ती घेतली. किरण बेदींचे शिक्षण अमृतसरमधील सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूलमधून झाले. शिक्षणाबरोबरच किरण बेदी या खेळातही चपळ होत्या. शाळेत असताना त्या एन.सी.सी.त होत्या. त्या शाळेच्या ग्रंथालयाचा खूप उपयोग करायच्या. त्यानंतर त्यांनी ङ्गगव्हर्नमेंट कॉलेज फॉर वीमेनफ यामध्ये प्रवेश घेतला. पोलीस सेवेतील कारकीर्द सुरू करण्यापूर्वी किरण बेदी या अमृतसर येथील खालसा महाविद्यालयात राज्यशास्त्र विषयाच्या प्राध्यापक होत्या. किरण बेदी पोलीस अधिकारी होण्याआधी या उत्कृष्ट टेनिस खेळाडू होत्या. ऑल इंडिया हार्ड कोर्ट टेनिस चॅम्पियन, १९७४ च्या चंदीगडमधील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील महिला चॅम्पियन, श्रीलंका विरुद्ध दोन वेळा भारताचे प्रतिनिधित्व अशी त्यांची टेनिसमधील उल्लेखनीय कामगिरी आहे. किरण बेदी यांची पोलीस अधिकारी म्हणून पहिली नेमणूक दिल्लीच्या चाणक्यपुरीत झाली. मसूरी येथील राष्ट्रीय अकादमीमध्ये पोलीस ट्रेनिंगमध्ये ८० पुरुष तुकडीतील त्या एकमेव महिला होत्या. पुढे त्या उत्तर आणि पश्चिम दिल्लीच्या पोलीस आयुक्त झाल्या. १९९३ मध्ये दिल्लीतील तिहार कारागृहाच्या त्या मुख्य अधीक्षक (इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स) झाल्या. तेथे असताना त्यांनी कारागृहामध्ये अनेक सुधारणा केल्या. ज्याची जागतिक स्तरावर प्रशंसा झाली आणि या सुधारणेसाठी १९९४ मध्ये त्यांना रेमन मॅगसेसे पुरस्कार मिळाला. किरण बेदी यांनी उत्तर दिल्लीच्या डीसीपी असताना ड्रग्जचा दुरूपयोग करणाऱ्यांविरुद्धच्या मोहिमेची सुरुवात केली. ही मोहीम पुढे नवज्योती दिल्ली पोलीस फाऊंडेशन आणि २००७ मध्ये नवज्योती इंडिया फाऊंडेशन म्हणून विकसित झाली. त्यांनी सामाजिक कार्य आणि लेखन यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी २००७ मध्ये पोलीस खात्याचा राजीनामा दिला.

# गुटख्याची राजरोसपणे विक्री

**• रात्रभर चहा टपऱ्या गजबजलेल्या; पनवेल बस स्थानक परिसरात नियमांची पायमल्ली**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल बस स्थानक परिसरात महाराजा स्वीटस कॉर्नरसमोर उड्डाणपूलाखाली रात्रीच्या वेळी नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीर चहाच्या टपऱ्या आणि दुकाने रात्रभर सुरू राहत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या टपऱ्यांवर प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू आणि सिगारेटची राजरोसपणे मोठ्या प्रमाणावर विक्री केली जात आहे. या वाढत्या अवैध व्यवसायांवर अन्न व औषध प्रशासनाने तातडीने कडक कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.




मुंबई आणि कोकणला जोडणारे मुख्य केंद्र असलेल्या पनवेल बस स्थानक परिसरात सध्या रात्रीच्या वेळी अवैध धंद्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. शासकीय नियमांनुसार ठरावीक वेळेनंतर दुकाने व टपऱ्या बंद करणे बंधनकारक असतानाही, या परिसरात अनेक चहाच्या टपऱ्या आणि स्टॉल्स रात्रभर सुरू राहत आहेत. सर्वात गंभीर बाब म्हणजे, राज्यात बंदी असलेला गुटखा आणि सुगंधित तंबाखू या टपऱ्यांवर अगदी सहज आणि चढ्या दराने विकला जात आहे.

### मध्यरात्री अनधिकृत व्यवसाय तेजीत

रात्रीच्या वेळी एसटीने प्रवास करणारे प्रवासी, चालक आणि वाहक यांच्या नावाखाली हे चहाचे स्टॉल्स सुरू ठेवले जातात. मात्र, मध्यरात्रीनंतर या ठिकाणी स्थानिक टवाळखोर, गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक आणि अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांची गर्दी वाढत असल्याचे दिसून येत आहे. चहाच्या आडून सिगारेट आणि गुटखा उपलब्ध असल्याचे फलक लावून किंवा छुप्या पद्धतीने अमली पदार्थांची विक्री केली जात आहे.

### अन्न व औषध प्रशासनाचे दुर्लक्ष

स्थानिक पोलीस आणि अन्न व औषध प्रशासनाचे या गंभीर प्रकाराकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. केवळ एखादी थातुरमातूर कारवाई न करता, अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी या ठिकाणी रात्रीच्या वेळी अचानक छापे टाकून अवैध साठा जप्त करणे आणि संबंधित टपरी चालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करणे गरजेचे आहे. ''प्रवाशांच्या हक्काच्या आणि सुरक्षिततेच्या पनवेल बस स्थानक परिसराला अशा अवैध धंद्यांचे केंद्र बनू देऊ नये, यासाठी प्रशासनाने तात्काळ मोहीम हाती घ्यावी,'' अशी तीव्र भावना पनवेलमधील सुजाण नागरिकांमधून व्यक्त होत आहे. दरम्यान, महाराष्ट्र राज्यात गुटखा आणि सुगंधित तंबाखूच्या विक्रीवर पूर्णपणे बंदी असतानाही पनवेल डेपोबाहेर याची राजरोस विक्री अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते.




# रस्त्याच्या मधोमध धोकादायक फांद्या

**। सुतारवाडी । प्रतिनिधी ।**

कोलाड-रोहा मार्गावरील घाटावपर्यंत रहदारीच्या मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा धोकादायक मोठ्या फांद्या आलेल्या आहेत. वादळी वाऱ्यासह पाऊस आला तर त्या फांद्या रस्त्यावर येण्याची शक्यता आहे. कोलाड ते रोहा मार्गावर रात्रंदिवस दुचाकी, तीन चाकी, तसेच अन्य वाहनांची सातत्याने वर्दळ असते. त्याचप्रमाणे पायी जाणारे कामावर जाणारे आणि सायकलवर जाणारे प्रवासी मोठ्या प्रमाणावर असतात. अशा प्रवाशांना रस्त्यावर प्रवास करताना टांगती तलवार असते.

या धोकादायक फांद्या हटवणे गरजेचे आहे. संबंधित खात्याने लक्ष देऊन रस्त्यावर आलेल्या, धोकादायक फांद्या पावसाळ्यापूर्वी हटवाव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

# किल्ले रायगड येथे स्वच्छता अभियान

**■ वेदक कॉलेजमधील स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त सहभाग**

**। तळा । प्रतिनिधी ।**

मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या वतीने रविवारी (दि.७) ऐतिहासिक किल्ले रायगड येथे 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत विशेष स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली. या अभियानात जी.एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.

या उपक्रमात श्रावणी बारटक्के, रिया अडसुळे, उत्कर्ष चव्हाण, नम्रता चव्हाण, रितेश शिंदे, यश मोरे, वैभवी चिचघरकर, सिद्धार्थ मोरे आणि धिरज गंभीर या स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांसमवेत राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. एन.एम. शेख व डॉ. पी.बी. अभंगे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे यांनी आवश्यक मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयाचे शिक्षणमहर्षी डॉ. नंदकुमार वेदक, संस्थेचे सचिव उन्मेश वेदक, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य रायगड भूषण पत्रकार पुरुषोत्तम मुळे तसेच स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य व द.ग. तटकरे महाविद्यालयाचे प्रा. डॉ. नानासाहेब यादव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत असल्यामुळे अशा सामाजिक उपक्रमांना सातत्याने यश प्राप्त होत आहे.




स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा संदेश देणारा हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# शिव आधार संस्थेचा वृक्षारोपण उपक्रम

**। खारघर । प्रतिनिधी ।**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सेक्टर-११, खारघर येथील शिव आधार सामाजिक सेवा संस्थेच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत संस्थेने विविध देशी वृक्षांची लागवड केली. विशेष म्हणजे, ही संस्था दरवर्षी केवळ एक झाड लावण्याचा संकल्प करत असली, तरी त्या झाडाचे संगोपन आणि संवर्धन अत्यंत काळजीपूर्वक करते. संस्थेने आतापर्यंत एकूण १२ झाडांची लागवड केली असून सर्व झाडे सुस्थितीत वाढत आहेत. या झाडांची नियमित देखभाल व संरक्षणाची जबाबदारीही संस्था स्वतः पार पाडत आहे. संस्थेने




वड, पिंपळ, कारंजा, बदाम तसेच कॉनॉकोरपस यांसारख्या विविध वृक्षांची लागवड केली आहे. वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण होत असलेल्या सिमेंटच्या जंगलात हरितपट्टा निर्माण करण्यासाठी आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. ''वृक्ष लावा आणि वृक्ष जगवा'' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देत शिव आधार सामाजिक सेवा संस्था पर्यावरण संरक्षणासाठी मोलाचे योगदान देत असून, नागरिकांनीही अशा उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# कळंबोली वाहतूक पोलिसांकडून वृक्षारोपण

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कळंबोली वाहतूक शाखेच्या वतीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत कळंबोली परिसरात ४५ वृक्षांची लागवड करण्यात आली. बदाम, तह, नारक, आवळा, लिंब, करंज, अशोक, चाफा आणि पिंपळ या विविध प्रजातींच्या वृक्षांचे रोपण करून हरित परिसर निर्मितीचा संकल्प करण्यात आला.

वाढते प्रदूषण, तापमानवाढ आणि झपाल्चाने कमी होत असलेले हरित क्षेत्र यामुळे पर्यावरण संवर्धनाची गरज अधिक तीव्र झाली आहे. या पार्श्वभूमीवर जागतिक पर्यावरण दिनानिमित कळंबोली वाहतूक शाखेच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, कळंबोली परिसरातील निवडक ठिकाणी एकूण ४५ वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमात कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक पांडुरंग साठे, वाहतूक शाखेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग घेत पर्यावरण संवर्धनाचा संदेश यावेळी देण्यात आला.

# सुमतीबाई देव विद्यालयाचा हीरक महोत्सव साजरा

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

पेण शिक्षण महिला समिती संचलित श्रीमती सुमतीबाई वि. देव प्राथमिक विद्यालयास (सुबोध विद्यालय) ६० वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने ६ जून रोजी विद्यालयाचा हीरक महोत्सव मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रसिध्द लेखक, व्याख्याते गप्पाष्टकार डॉ. संजय उपाध्ये हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षा संस्थेच्या अध्यक्षा सुहासिनी देव या होत्या. तसेच




संस्थेचे सर्व संचालक मंडळ यावेळी उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांचा, शाळेच्या माजी मुख्याध्यापिका विद्या जोशी, शिशुविकास मुख्याध्यापिका प्रतिभा समेळ, प्रज्ञा कावतकर (शिक्षिका), संतोष बारी (क्लार्क) यांचा संस्थेकडून विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा सुहासिनी देव यांनी अध्यक्षीय मनोगतात विद्यालयाच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतचा प्रवास मांडला. तसेच विद्यालयाची यशस्वी वाटचाल आणि प्रगतीबाबत समाधान व्यक्त करत शिक्षक, विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास संस्थेची माध्यमिक शाळा, इंग्रजी माध्यमिक शाळा, शिशु विकास मंदिर मधील मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी हजर होते. तसेच माजी मुख्याध्यापक, माजी शिक्षक, माजी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेकांनी आपल्या मनोगतात शाळेच्या प्रवासातील आठवणींना उजाळा दिला.

## दुकानाचे शटर तोडून भांडी लंपास

**पनवेल :** तळोजा फेस वन येथील दुकानाचे शटरचे लॉक तोडून तीन अनोळखी महिलांनी हजारो किमतीची भांडी चोरून नेली. गौरव पवार हे पिसार्वे, तळोजा येथे राहत असून त्यांच्या स्काय लाईन सफायर सोसायटी, तळोजा फेस वन येथे दुकान आहे. तीन अनोळखी महिलांनी दुकानाचे शटरचे लॉक तोडून आत प्रवेश करून दुकानातील ३१ हजार ८०० रुपयांची भांडी चोरून नेली. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**राजापूरच्या प्रागैतिहासिक वारशात मोलाची भर | इतिहास अभ्यासक विनोद पवार यांचे यश**

# अश्मयुगीन मानवाकृती कातळशिल्पाचा शोध

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील पन्हाळे तर्फे सौंदळ परिसरात इतिहास अभ्यासक तथा पत्रकार विनोद पवार यांना अश्मयुगीन (प्रागैतिहासिक) कालखंडाशी संबंधित एक अत्यंत महत्त्वपूर्ण मानवाकृती कातळशिल्प शोधण्यात यश आले आहे. या अभूतपूर्व शोधामुळे राजापूर तालुक्याच्या समृद्ध प्रागैतिहासिक, ऐतिहासिक वारशात आणखी एका वैशिष्ट्यपूर्ण आणि महत्त्वपूर्ण स्थळाची भर पडली आहे.

हा ऐतिहासिक शोध पन्हाळे माळवाडी परिसरातील जांभ्या दगडाच्या विस्तीर्ण सड्यावर



लागला आहे. आढळून आलेले कातळशिल्प सुमारे चार फूट उंच आणि तीन फूट रुंद आकाराचे असून, ते एका मानवाकृतीच्या स्वरूपात आहे. या आकृतीचे दोन्ही हात बाजूला पसरलेल्या अवस्थेत कातळात कोरलेले असून, दगडात अंदाजे एक इंच खोलीपर्यंत हे खोदकाम करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, दुरून पाहिल्यास एखाद्या व्यक्तीची हुबेहूब सावलीच कातळावर उमटली असल्याचा अनोखा भास या आकृतीमुळे होतो.

कोकणच्या किनारपट्टीवर आढळणारी कातळशिल्पे ही प्रागैतिहासिक मानवाच्या जीवनशैली, त्यांच्या तत्कालीन श्रद्धा, निसर्गाशी असलेले घट्ट नाते आणि आदिम ज्ञानपरंपरेची जिवंत साक्ष देणारी मानली जातात. पन्हाळे तर्फे सौंदळ येथे मिळालेली ही मानवाकृती देखील अशाच एका प्राचीन मानवी संस्कृतीच्या वारशाचा भाग असण्याची दाट शक्यता आहे. याच कारणास्तव या नवीन स्थळाचा पुरातत्त्वीय आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून सखोल अभ्यास होण्याची नितांत आवश्यकता आता व्यक्त केली जात आहे.

या कातळशिल्पाचा प्राथमिक शोध लागल्यानंतर संपूर्ण परिसराची पद्धतशीर पाहणी, स्वच्छता आणि प्राथमिक दस्तऐवजीकरण करण्याचे काम करण्यात आले. या महत्त्वपूर्ण संशोधन मोहिमेमध्ये विनोद पवार यांना स्थानिक इतिहासप्रेमी पराग पारकर, वरद पवार, वरुण जाधव, यश इंगळे आणि समर्थ आबवले यांचे बहुमूल्य सहकार्य लाभले. त्यांच्या सक्रिय मदतीमुळेच हे प्राचीन कातळशिल्प पूर्णपणे उघडकीस आणणे आणि त्याची शास्त्रीय नोंद घेणे शक्य झाले.

### व्यापक संशोधन करण्याची मागणी

इतिहासप्रेमी, संशोधक आणि पुरातत्त्व विभागाच्या अभ्यासकांनी या स्थळाला प्रत्यक्ष भेट देऊन यावर व्यापक संशोधन करावे, तसेच शासनाच्या संबंधित पुरातत्त्व आणि सांस्कृतिक विभागांनी या प्राचीन अश्मयुगीन वारशाचे जतन व संवर्धन करण्यासाठी तातडीने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

९ जून

१) श्री. नारायण सदाशिव केळकर
अलिबाग, ९-६-१९४७

२) श्री. अनिल दत्तात्रेय सिनकर
अलिबाग, ९-६-१९४७

३) श्रीम. विजया विश्वनाथ मोहिते
अलिबाग, ९-६-१९५२

४) श्री. शरद गिरीधर पाटील
अलिबाग, ९-६-१९६१

५) अमिता भरत शहा
अलिबाग, ९-६-१९५९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

**वाढदिवस साजरा करा अन्नदानाने**

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८
**(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

## कळंबोलीत जुगार अड्ड्यावर छापा

**पनवेल :** कळंबोली येथे मॅकडोनाल्डच्या पाठीमागे मोकळ्या जागेत सार्वजनिक ठिकाणी अंदर बाहेर पत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या पाच जणांवर गुन्हे शाखा कक्ष ३ने छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत २७ हजार ६०० रुपये जप्त करण्यात आले. गुन्हे शाखा कक्ष ३ ला कळंबोली मॅकडोनाल्डच्या पाठीमागील बाजूस मोकळ्या जागेत सार्वजनिक ठिकाणी अंदर बाहर हा पत्त्यांचा जुगाराचा खेळ खेळत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी रियाज सनसुर खान, हकीम अमीर मंडळ, गोविंदा सुखदेव गोरे, अनवर अकबर शेख, धर्मापद टेंभे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत त्यांच्याकडून २७ हजार ६०० रुपये जप्त करण्यात आले आहेत.

## मृतदेहाची ओळख पटविण्याचे आवाहन

**पनवेल :** तळोजा भागात मृतावस्थेत सापडलेल्या एका व्यक्तीची अद्याप ओळख पटलेली नाही. त्यामुळे तळोजा पोलिसांनी या व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी नागरिकांना आवाहन केले आहे. ही व्यक्ती २८ मे रोजी सायंकाळी तळोजा परिसरात बेशुद्धावस्थेत आढळून आली होती. तळोजा पोलिसांनी त्याला पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले; मात्र तिथे तपासणीपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. मृत व्यक्ती अंदाजे ४० वयोगटातील असून अंगावर लाल रंगाचा चौकटीचा फुल बाह्यांचा शर्ट आणि काळी हाफ पॅन्ट आहे. या वर्णनाच्या व्यक्तीबाबत काही माहिती असल्यास त्यांनी तळोजा पोलिसांशी संपर्क साधावा.

# निवडक




## धनाजी घरत पुरस्काराने सन्मानित

**खरोशी :** राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार पेण एज्युकेशन सोसायटीची प्राथमिक शाळा पेण येथील सहाय्यक शिक्षक धनाजी रामभाऊ घरत यांना देऊन सन्मानित करण्यात आले. धनाजी घरत यांनी आजपर्यंत शाळेत विविध उपक्रम राबवणे, शैक्षणिक लोकसहभाग वृक्षारोपण गरीब गरजू विद्यार्थ्यांना मदत, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, यासारखे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी सातत्याने प्रयत्न करीत आहेत. शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक कार्यातील विशेष योगदानाबद्दल त्यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. धनाजी घरत यांना आजपर्यंत रायगड भूषण, राज्यस्तरीय पुरस्कार, राष्ट्रीय पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार, पत्रकारिता पुरस्कार, उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार, दैनिक रत्नागिरी टाइम्सचा उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार, मानव भूषण पुरस्कार, छत्रपती शाहू महाराज पुरस्कार, आगरी समाज विकास मंचचा समाजरत्न पुरस्कार बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार आदीसह अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या या कार्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, उपकार्याध्यक्ष संजय कडू विविध सामाजिक व शैक्षणिक संस्था, मंडळ, पत्रकार शिक्षक पालक आदिनी अभिनंदन केले.

## शहर अध्यक्षपदी कपिल कुरघोडे

**पनवेल :** शिवसेना पनवेल महानगरमधील पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, कामोठे, कळंबोली, खारघर येथील युवासेनेच्या शहर अध्यक्ष, सचिव, समन्वयक, उपाध्यक्ष तसेच महानगर उपाध्यक्ष या पदांच्या नेमणुका युवासेना मध्यवर्ती कार्यालय येथून करण्यात आल्या आहेत. पनवेलमधील शिवसैनिक कपिल भरत कुरघोडे यांची पनवेल शहर अध्यक्षपदी, तर विनीत पाटील यांची शहर सचिवपदी नेमणूक करण्यात आल्याचे युवासेना मध्यवर्ती कार्यालयातर्फे जाहीर करण्यात आले आहे. भरत कुरघोडे यांना मिळालेल्या पनवेल युवासेना अध्यक्षपदामुळे पनवेलमधील शिवसैनिक, युवा शिवसैनिक, कार्यकर्ते यांच्यामधे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्यावर पनवेलमधील शिवसेना, युवासेना, कार्यकर्त्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



## व्हॉट्सअ‍ॅपद्वारे लाखोंची फसवणूक

**पनवेल :** अज्ञात सायबर चोरट्याने हॉटेल मालक असल्याचे भासवून ताराचंद इंडस्ट्रीज लिमिटेडच्या पल्लवी अविदा हॉटेलमधील एका सीनियर अकाऊंटण्टला व्हॉट्सअ‍ॅपद्वारे पैसे पाठवण्यास सांगून तब्बल ३८ लाख ३० हजार रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कळंबोली पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात सायबर चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील तक्रारदार हितेश दहिवलीकर (३१) हा कळंबोली सेक्टर-१० ई मधील पल्लवी अविदा हॉटेल येथे सीनियर अकाऊंटण्ट म्हणून कार्यरत आहे. नेहमीच्या कामाचा भाग म्हणून हॉटेलचे मालक, हितेशला व्यवहाराचे पेमेंट करण्यासाठी व्हॉट्सअ‍ॅपवर मेसेज करत असतात. याचीच माहिती मिळवून एका सायबर चोरट्याने हॉटेल मालकाच्या नावाने व कंपनीचा लोगो (डीपी) असलेल्या व्हॉट्सअ‍ॅप नंबरवरून हितेशला मेसेज पाठवला. त्यानंतर सायबर चोरट्याने हॉटेल मालक असल्याचे भासवून प्रथम बँक खात्यातील किती रक्कम शिल्लक आहे, याची विचारणा केली. हितेश याने व्हॉट्सअ‍ॅप नंबरवरील कंपनीचा डीपी पाहिल्यावर ही व्यक्ती हा कंपनीचा मालक आहे, असे समजून कंपनीच्या खात्यात ४० लाख २४ हजार रुपये शिल्लक असल्याची माहिती व्हॉट्सअ‍ॅपवर पाठवली. त्यानंतर सायबर चोरट्याने हितेशला दोन वेगवेगळ्या बँक खात्यांवर पैसे पाठवण्यास सांगितले. मालकाचा आदेश समजून हितेशने जनरल मॅनेजर हंसराज यांच्याशी संपर्क साधून चेक ऑथोराईझ करून घेतले. त्यानंतर पंजाब येथील बँक खात्यात १९ लाख ७० हजार रुपये, तर गुजरात येथील बँक खात्यात १८ लाख ६० हजार रुपये असे एकूण ३८ लाख ३० रुपये आरटीजीएसद्वारे ऑनलाइन ट्रान्सफर केले. पैसे ट्रान्सफर झाल्यानंतर पुन्हा या व्हॉट्सअ‍ॅप नंबरवरून समोरच्या व्यक्तीने आणखी पैशांची मागणी केली. दरम्यान, हॉटेल मालक तेथे पोहोचल्याने हितेश याला संशय आला व त्याने हॉटेल मालकाकडे या व्हॉट्सअ‍ॅपद्वारे आलेल्या मेसेजबाबत विचारणा केली. त्यावर मालकाने त्याला कोणताही मेसेज पाठवला नसल्याचे तसेच पैसे पाठवण्यास सांगितले नसल्याचे स्पष्ट केले. या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे हितेशच्या लक्षात आल्यानंतर त्याने कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.



## प्रणव शिर्केची पोलीस दलात निवड

**माणगाव :** प्रचंड मेहनत, जिद्द आणि इच्छाशक्ती याच्या बळावर माणगाव वाकडाईनगर येथील प्रणव संदीप शिर्के याची वयाच्या २० व्या वर्षी इंडियन आर्मी व मुंबई कारागृह पोलीस दलात अशी एकाच वेळी दोन ठिकाणी निवड झाली. त्याच्या या निवडीबद्दल त्याचे सर्व स्तरांतून विशेष अभिनंदन व कौतुक होत आहे. माणगाव नगरीच्या नगरसेविका ममता थोरे व सामाजिक कार्यकर्ते वैभव शेट यांनी प्रणव यांच्या निवासस्थानी भेट घेऊन त्यांचे विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. माणगाव शहरातील वाकडाईनगर गावासाठी प्रणवच्या रूपाने एकाचवेळी आर्मी व पोलीस दलातील भरती म्हणजे एक अभिमानाचा आणि प्रेरणादायी असा क्षण ठरला आहे. वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी प्रणव संदीप शिर्के यांनी भारतीय सैन्य दलात म्हणजेच इंडियन आर्मीमध्ये तसेच मुंबई कारागृह पोलीस दलात यशस्वी निवड मिळवत आपल्या कुटुंबाचे,गावाचे आणि संपूर्ण परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे. प्रचंड आत्मविश्वास, ध्येय व मेहनत घेण्याची आजच्या तरुणांची तयारी असेल, तर यश हे नक्कीच दूर नाही असे प्रणवने प्रसार माध्यमांजवळ बोलताना सांगून आजच्या तरुणांनी प्रचंड मेहनत घेऊन ध्येय पूर्ती ठेऊन काही करायचे ठरविल्यास यश हे नक्कीच मिळते, असेही त्यांनी सांगितले. प्रणवच्या या दुहेरी यशाने वाकडाईनगर परिसरात आनंदाचे वातावरण असून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# जिते प्राथमिक आरोग्य उपकेंद्र कुलूपबंद

## ● टी.एस.पी.योजनेअंतर्गत कोट्यवधींचा खर्च ●आजारांची माहिती देणारे फलक भिंतीवर



| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील जिते गावाच्या बाहेर महाराष्ट्र शासनाच्या रायगड जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत 'टी. एस. पी.' योजनेअंतर्गत कोट्यवधी रुपये खर्च करून प्राथमिक आरोग्य उपकेंद्र बांधण्यात आले आहे. नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जिते येथील उपकेंद्राच्या कोटींचा खर्च झाला असून येथे आरोग्य सेवा देण्यासाठी एक भव्य आणि देखणी वास्तू उभारण्यात आली होती. मात्र, प्रशासकीय अनास्थेमुळे या इमारतीची दयनीय स्थिती झाली असून कोट्यवधींचा खर्च करूनही हे प्राथमिक आरोग्य केंद्र सध्या पूर्णपणे बंद स्थितीत आहे. दरम्यान येथे वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य सेविकांची नियुक्ती शासनाने केलेल्या नाहीत आणि त्यामुळे उपकेंद्र तीन वर्षांपासून बंद स्थितीत आहे.

नेरळ प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या जिते येथील उपकेंद्राच्या इमारतीचे बांधकाम आदिवासी उपयोजना यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. इमारतीचे बांधकाम जून २०२१ मध्ये सुरू झाले होते आणि मार्च २०२३ मध्ये ते पूर्ण झाले. यासाठी सुमारे २ कोटी ३२ लाख रुपयांची भव्य अंदाजपत्रकीय रक्कम खर्च करण्यात आली आहे. रोशन कन्स्ट्रक्शन मार्फत हे काम पूर्ण करण्यात आले.

मात्र, इतकी मोठी रक्कम खर्च करूनही आज या आरोग्य केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वाराला कायमचे टाळे लागलेले पाहायला मिळत आहे. या ठिकाणी आरोग्यविषयक जनजागृती करणारे आणि विविध आजारांची माहिती देणारे मोठे फलक भिंतीवर दिमाखात लावण्यात आलेले आहेत. परंतु, प्रत्यक्षात मात्र येथील आरोग्य व्यवस्थेचा पुरता बोजवारा उडालेला पाहायला मिळत आहे.

इमारतीची अवस्था दिवसेंदिवस खालावत चालली असून, सभोवताली चारी बाजूंनी वाळलेल्या गवताने आणि झाडीझुडपांनी वेढा घातला आहे. सद्यस्थिती पाहता, येथे रुग्णांवर उपचाराची आवश्यकता नसून, या रुग्णालयावरच उपचार करण्याची वेळ आली आहे असे विदारक चित्र दिसत आहे.

या गंभीर समस्येबाबत आरोग्य विभागाकडे विचारणा केली असता, पुरेसा स्टाफ उपलब्ध नसल्यामुळे नेरळ येथील आरोग्य कर्मचारी या रुग्णालयाला वेळोवेळी भेट देत असतात, असे सांगून हात झटकण्याचा प्रयत्न केला जात आहे.

मात्र, रुग्णालयाची सध्याची कुलूपबंद स्थिती पाहता, येथे कोणताही डॉक्टर, आरोग्य सेवक अथवा अधिकारी फिरकत नसल्याचे उघड झाले आहे. केवळ कागदोपत्री घोडे नाचवून नागरिकांच्या डोळ्यात धूळ फेकली जात आहे. घराशेजारीच सर्व सुविधायुक्त शासकीय रुग्णालय उभे असूनही नागरिकांना त्याचा कोणताही उपभोग घेता येत नाही.

> "नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जिते उपकेंद्राचे काम पूर्ण झाले असून इमारती उभी आहे. मात्र शासनाने येथील नियुक्त्या केल्या नसल्याने रुग्णाची गैरसोय टाळण्यासाठी नेरळ जिल्हा परिषद गटातून निवडून आलेल्या सदस्या सुनीता मोरे यांच्या सूचनेनुसार तात्पुरत्या स्वरूपात पिंपळोली उपकेंद्राच्या आरोग्यसेविकांना जिते येथे उपकेंद्राचे जबाबदारी दिली आहे.
> —डॉ नितीन गुरव, तालुका आरोग्य अधिकारी"

या उपकेंद्रामध्ये लवकरात लवकर पूर्णवेळ डॉक्टर आणि कर्मचारी नियुक्त करून रुग्णसेवा सुरू करावी, अशी मागणी जोर धरत आहे. आता यावर संबंधित वरिष्ठ आरोग्य अधिकारी आणि स्थानिक लोकप्रतिनिधी काय भूमिका घेतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# निवडक



## वैश्य वाणी मंडळातर्फे अधिकमास कार्यक्रम

**नवीन पनवेल :** पनवेल तालुका वैश्य वाणी समाज महिला मंडळ यांनी आयोजित केलेला अधिक मास कार्यक्रम खूप मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात वैश्य समाज हॉल, मिरची गल्ली, पनवेल येथे साजरा केला. या कार्यक्रमाचे संपूर्ण श्रेय वैश्य समाज महिला मंडळ ज्येष्ठ कमिटी, रेखा जगे, भारती आंग्रे, माधुरी वाणी, रतिका जगे, रंजना तांबोळी, शुभदा मनोरे, ज्योत्स्ना मनोरे, वैशाली सोनटक्के , पुष्पा आंग्रे यांचे आहे. तसेच वैश्य समाज महिला अध्यक्षा पूजा साखरे व सर्व कमिटी यांचेही या कार्यक्रमात मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रसिका महाजन यांनी केले. या कार्यक्रमासाठी वैश्य समाज रायगड जिल्हा महिला अध्यक्षा शामल आंग्रे, सुनील शेटे, प्रदीप दलाल, प्रवीण जगे, प्रगती दलाल, सर्वेश दलाल, ममता फक्के, अश्विनी अशोक जगे, सुनील शेटे, प्रगती प्रदीप दलाल तसेच वैश्य समाज महिला मंडळ सर्व आजी-माजी अध्यक्ष -उपाध्यक्ष यांनी या कार्यक्रमास हजेरी लावली. वैश्य समाज महिला मंडळने या सर्वांचे आभार मानले.



## बी-बियाणे खरेदीसाठी गर्दी

**पनवेल :** जून महिन्याच्या सुरुवातीलाच वाढलेल्या उकाड्यामुळे सर्वसामान्यांसह शेतकरी वर्गही हैराण झाला आहे. आता बळीराजाला वेध लागले आहेत, ते वरुणराजाच्या आगमनाचे. पावसाच्या पहिल्या सरी कोसळताच खरीप हंगामाच्या पेरणीला सुरुवात होणार असल्याने शेतकरी सध्या तयारीला लागले आहेत. पनवेल येथील रायगड बाजार परिसरातील कृषी साहित्य विक्रीच्या दुकानांमध्ये सध्या बी-बियाणे, खते आणि शेतीसाठी लागणाऱ्या विविध साहित्याच्या खरेदीसाठी मोठी गर्दी होत आहे. अनेक शेतकरी आपल्या कुटुंबासह बाजारात येऊन आवश्यक साहित्याची खरेदी करताना दिसत आहेत. यंदा चांगला पाऊस होईल, अशी आशा बाळगून शेतकरी सोयाबीन, भात, नाचणी, भाजीपाला तसेच इतर पिकांसाठी आवश्यक बियाणे आणि खते खरेदी करत आहेत. कृषी दुकानांमध्येही विविध कंपन्यांच्या बियाण्यांचा आणि खतांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्यात आला आहे. दरम्यान, वाढत्या तापमानामुळे पावसाची प्रतीक्षा अधिक तीव्र झाली असून, वरुणराजा लवकरच हजेरी लावून खरीप हंगामाला सुरुवात होईल, अशी अपेक्षा बळीराजा व्यक्त करत आहे. पावसाच्या आशेवर उभ्या असलेल्या शेती व्यवसायासाठी आगामी काही दिवस अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.

## कुणबी समाजोन्नती संघाची बैठक



**रोहा :** कुणबी समाजोन्नती संघ मुंबई शाखा रोहा यांच्या वतीने रोहा तालुक्यात कुणबी समाजाची जन गणना प्रभावीपणे राबविण्यासाठी ग्रुप निहाय बैठकींचे आयोजन करण्यात आले आहे. यात प्रामुख्याने तालुक्यातील मेढा, नागोठणे, खांब आणि कोलाड या ग्रुपमध्ये आयोजित बैठकींना समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी कुणबी समाजोन्नती संघ मुंबईचे उपाध्यक्ष शंकरराव म्हसकर, ओबीसी रायगड जिल्हाध्यक्ष सुरेश मगर, कुणबी समाज रायगड जिल्हा समन्वय समितीचे अध्यक्ष शिवराम महाबळे, रोहा ता. अध्यक्ष रामचंद्र सकपाळ, रोहा पं.स. उपसभापती संजय माडळुकर, तालुका उपाध्यक्ष अनंता थिटे, तालुका खजिनदार सुहास खरीवले, उद्योजक प्रमोद म्हसकर कुणबी समाजोन्नती संघ मुंबई शाखा युवक कमिटी सदस्य मंगेश सानप आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी निवास खरीवले, रघुनाथ करंजे, दिलीप आवाज, हिराजी शिंदे, मारुती खांडेकर, रामचंद्र चितळकर, संजय कदम आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सिराज परदेशींच्या पुढाकाराने नाले सफाई

**माणगाव :** माणगाव नगरपंचायत हद्दीतील वॉर्ड क्र.१७ मधील नाले सफाईचे काम नगरीचे माजी नगराध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते सिराज परदेशी यांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने पूर्ण केले. सिराज परदेशी व ग्रामस्थांच्या या समाजसेवी उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. मान्सूनचे आगमन झाले असून, कोकणात दरवर्षी मोठ्याप्रमाणात पाऊस पडत असतो. त्यातच वॉर्ड क्र.१७ हा परिसर माणगावमधून वाहणाऱ्या काळनदीच्या जवळच आहे. या भागात जोरदार पर्जन्य वृष्टी झाल्यावर संपूर्ण परिसरात पाणीच पाणी साचते. हे गांभीर्य व पुढील होणार धोका विचारात घेऊन या भागातील माजी नगरसेवक सिराज परदेशी यांनी विशेष पुढाकार घेत येथील ग्रामस्थांच्या सहकार्याने जेसीबी लावून तसेच कामगारांच्या सहकार्याने माणगांव दिवाणी व फौजदारी न्यायालय येथून पुढे बाजारटेप मोहल्ला व काळनदीपर्यंत नाले सफाई करून घेतली. सिराज परदेशी व ग्रामस्थांच्या या कार्याचे अनेकांनी कौतुक केले जात आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● आवास परिसरामध्ये हाऊस किपिंग स्टाफ भरणे आहे. १५००० पगार +PF+ ESIC ८ तास ड्युटी.
मो.नं. ९३७०५७९१६३, ८८३०२७७९५८

● Office staff required Graduates can call for interview. Trainee undergraduates required.
Call 9150717038

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**रसायनी :** द्वारकाधीश ट्रस्टतर्फे जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत जिल्हा परिषद शाळा कल्हे येथील ७८ विद्यार्थ्यांना, जिल्हा परिषद शाळा बानुबाईवाडी येथील ३५, जिल्हा परिषद शाळा दाभोळवाडी येथील २६, जिल्हा परिषद शाळा गंगेचीवाडी येथील ८ आणि रसायनी पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी जवळच्या दुर्गम भागातील जिल्हा परिषद शाळा माडभुवन (सारसई) येथील १८ अशा एकूण १६५ विद्यार्थ्यांना प्रत्येकी सहा वह्या, पेन, पेन्सिल, खोडरबर, शार्पनर आणि पाऊच यांचे वाटप करण्यात आले.

## आकुर्ले गावातील खड्डे भरण्यास नगरसेवकांचा पुढाकार



| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत नगरपरिषद हद्दीमधील आकुर्ले गावातील अंतर्गत रस्त्यावरील खड्डे स्थानिकांना त्रासदायक ठरत होते. नगरपरिषदकडून रस्त्याची दुरुस्ती होण्यासाठी नगरसेवक कुमेश मोरे यांचा पाठपुरावा सुरु आहे. मात्र, गावातील नागरिकांचे वाहतुकीला खराब रस्त्यामुळे अडथळे येऊ नयेत यासाठी रस्त्यावरील सर्व खड्डे नगर-सेवक मोरे यांनी स्वखर्चाने भरून घेण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

मोरे यांनी रस्त्यावर उभे राहून सर्व खड्डे भरून घेण्याची कार्यवाही केली असून मोरे यांच्या कार्याचे कौतुक केले आहे. कर्जत नगरपरिषद हद्दीमधील दहिवली नाका व आकुर्ले परिसरातील रस्त्यावर खड्डे पडले होते. ते सर्व खड्डे धोकादायक असल्याने रस्त्यावरील खादाडी वाहतुकीस अडथळे निर्माण करीत होते तर काही खड्डे दुचाकीचालकांना अपघातात कारणीभूत ठरत होते. दहिवली नाक्याजवळील नाजविला बिल्डिंगसमोरील स्पीडब्रेकरजवळ रस्त्याच्या संपूर्ण रुंदीएवढा मोठा खड्डा पडला होता. त्यामुळे वाहनांना धक्का बसून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती.

या कामामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून संभाव्य अपघाताची शक्यता टळली आहे.

## रेवदंडा बीचवर पर्यटकांची उसळली गर्दी



| रेवदंडा | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्याच्या पर्यटन वैभवात मानाचा तुरा ठरलेल्या रेवदंडा समुद्रकिनाऱ्यावर जून महिन्याच्या पहिल्याच विकेंडला पर्यटकांची अक्षरशः झुंबड उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले. वाढत्या उष्णतेने हैराण झालेल्या पर्यटकांनी रविवारी सकाळपासूनच रेवदंडा बीचकडे धाव घेत समुद्राच्या थंडगार पाण्यात डुंबण्याचा आणि फेसाळणाऱ्या लाटांशी खेळण्याचा मनसोक्त आनंद लुटला. एका बाजूला अथांग निळाशार अरबी समुद्र, किनाऱ्यावर पसरलेली रुपेरी वाळू, किनाऱ्यालगत हिरवीगार शाल पांघरल्यासारखी डोलणारी नारळी-फोपळीची बाग आणि समुद्राच्या लाटांचा मनमोहक गजर अशा निसर्गरम्य वातावरणामुळे रेवदंडा बीच पर्यटकांसाठी आकर्षणाचे प्रमुख केंद्र बनला आहे.

समुद्रात उसळणाऱ्या लाटांमध्ये युवक, युवती, कुटुंबीय आणि लहान मुले जलक्रीडांचा आनंद घेताना दिसत होते. किनाऱ्यावर उपलब्ध असलेल्या स्पीडबोट, बनाना राईड, बम्पर राईड, तसेच घोडा आणि उंट सफरींमुळे पर्यटकांचा उत्साह अधिकच वाढला होता. अनेकांनी समुद्रकिनाऱ्यावर छायाचित्रे आणि सेल्फी काढत आठवणी जपल्या, तर काहींनी समुद्राच्या सान्निध्यात निवांत क्षण घालवत निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेतला. रेवदंडा बीचच्या परिसरात व्यावसायिकांकडून विविध खाद्यपदार्थ, शीतपेये आणि समुद्री खाद्यपदार्थांची व्यवस्था करण्यात आली होती. पर्यटकांनी खाद्यसंस्कृतीलाही भरभरून प्रतिसाद दिला.

### लाटांमध्ये समुद्रस्नानाचा घेतला आनंद

शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी रेवदंडा बीचवर पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. यावेळीही किनाऱ्याकडे जाणाऱ्या रस्त्यांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. हिरव्यागार नारळी-पोफळीच्या बागांनी सजलेला, निसर्गसौंदर्याने नटलेला आणि फेसाळणाऱ्या लाटांच्या सहवासाने पर्यटकांना भुरळ घालणारा रेवदंडा बीच पुन्हा एकदा पर्यटनप्रेमींच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरल्याचे चित्र रविवारी पाहायला मिळाला.

## अचूक कर आकारणी ग्रामपंचायतीची जबाबदारी

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

ग्रामपंचायत हद्दीतील सर्व इमारती आणि अकृषीक वापराच्या जमिनी यांच्यावर ग्रामपंचायत अधिनियम अंतर्गत ग्रामपंचायत मार्फत कर आकारणी करणे आणि आकारणी केलेला कर वसूल करण्याबाबतच्या सूचना समीर वाठारकार, गटविकास अधिकारी पंचायत समिती, पनवेल यांनी सर्व ग्रामपंचायतींना केल्या आहेत.

ग्रामपंचायतींना कर आकारणीचा, कर वसुलीचा आणि त्याच्या वापराचा अधिकार प्राप्त असून हा घटनात्मक अधिकाराच्या आधारे राज्य कायद्याने प्रदान केलेला वैधानिक अधिकार आहे. त्यामुळे कोणत्याही तरतूदिन्वये ग्रामपंचायतीचा कर आकारणीचा अधिकार निष्कासित होत नाही. आणि कोणत्याही विशेष नियोजन प्राधिकरणाच्या स्थापनेमुळे ग्रामपंचायतीची कर आकारणी गैर लागू ठरत नाही. अकृषिक वापराच्या जमिनीबाबत ही ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आलेल्या कर आकारणीमुळे दुबारकर, दुहेरीकर अशी बाब निर्माण होत नाही. गावाच्या हद्दीतील सर्व इमारतींवर आणि अकृषिक वापर सुरू असलेल्या जमिनीवर कर आकारणी करणे आणि कराची वसुली करणे ही ग्रामपंचायतची प्रमुख कायदेशीर जबाबदारी आहे.

ग्रामपंचायतीकडून अचूक कार्यवाही करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे. ग्रामपंचायत हद्दीतील सर्व इमारतींवर कर आकारणी करताना काही इमारती कर आकारणी प्रक्रिया दरम्यान वगळल्या गेल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच कर आकारणीनंतर वाढीव बांधकाम झाल्याचे ही आढळून येते. त्यामुळे ग्रामपंचायतीचे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे वार्षिक मूल्य दर तक्त्यानुसार मिळकतीचे भांडवली मूल्यांकन काढून त्यावर ग्रामसभेमार्फत निश्चित करण्यात आलेल्या दराने कर आकारणी करण्याच्या सूचना केल्या आहेत.

## पनवेल येथे रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**पनवेल :** ओरायन मॉल पनवेल येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. याचे उद्घाटन डॉ. निलेश बांठिया यांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी रक्तदान शिबीराचे सहयोगी आय.डब्लुसी ग्यालेक्सी न्यु पनवेलचे प्रेसिडेंट भुमिका परमार व दिपा आडमुठे या उपस्थित होत्या. डॉ. बांठिया यांनी रक्तदान करुन शिबीराचा शुभारंभ केला. याप्रसंगी प्रशांत पोद्दार, संजय पोद्दार, महेश रहाळकर, केशव राणे, प्रल्हाद साटम. ॲड नागेश हिरवे यांनी रक्तदान केले. शिबिरात २६० रक्तदात्यांनी भाग घेतला होता. पण २०५ रक्तदात्यांना रक्तदान केले.

## नेहा केकाणेंची मुख्याध्यापिका पदी नियुक्ती



**माणगाव :** गोरक्षनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, जावळी यांच्या वतीने संस्थेच्या मुख्याध्यापिका पदासाठी नेहा केकाणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शैक्षणिक क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव, उल्लेखनीय शैक्षणिक पात्रता आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेली त्यांची तळमळ लक्षात घेऊन संस्थेने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ज्ञानार्जनाची सातत्यपूर्ण जिद्द आणि शिक्षणाबद्दलची बांधिलकी यामुळे त्यांनी स्वतःला एक सक्षम शिक्षणतज्ज्ञ म्हणून सिद्ध केले आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. या नियुक्तीबाबत गोरक्षनाथ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुभाष केकाणे, ॲड. राजीव साबळे, पदाधिकारी आणि सदस्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

## प्रवेशोत्सवाच्या दिवशीच मिळणार पाठ्यपुस्तके

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

२०२६-२७ या शैक्षणिक वर्षात शाळांची घंटा वाजण्यापूर्वीच श्रीवर्धन तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या हातात समग्र शिक्षा अभियान अंतर्गत शाळांमध्ये मोफत पाठ्यपुस्तके पडणार आहेत. शिक्षण विभागाने यासाठी आपली सर्व तयारी पूर्ण केली असून, विद्यार्थ्यांना पुस्तकांचे लवकर वाटप करण्यात येणार आहे.

येत्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांची धावपळ थांबवण्यासाठी शिक्षण विभागाने नियोजन केले आहे. तालुक्यातील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी सर्व विषयांची पाठ्यपुस्तके मिळणार आहेत. शिक्षकांना पहिल्या दिवसापासूनच अध्यापनाचे काम सुरू करता येणार आहे. विद्यार्थ्यांचा अभ्यासाचा पाया सुरुवातीलाच मजबूत होण्यास मदत होणार आहे.

नगरपरिषद शाळा, जिल्हा परिषद शाळा आणि खासगी अनुदानित शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीचे सर्व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी पुस्तके दिली जाणार आहेत, अशी माहिती श्रीवर्धन गटशिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांनी दिली आहे.

**श्रीवर्धन तालुक्यातील**
**विद्यार्थी संख्या-५०६५.**
**उपलब्ध पुस्तक संख्या - २४,४९९.**
**एकुण शाळा- १०७.**
**जिल्हा परिषद शाळा- ८६.**
**नगर परिषद शाळा-०५.**
**खाजगी अनुदानित शाळा -१६.**

### श्रीवर्धनमध्ये शिक्षण विभागाची तयारी पूर्ण

सहावी या इयत्तेचा अभ्यासक्रम बदलण्यात आला आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून हा अभ्यासक्रम अधिक सोपा करण्यात आला आहे, या बदललेल्या अभ्यासक्रमाची पुस्तके छपाई प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शाळांत दाखल होणार आहेत. तालुक्यातील एकही विद्यार्थी पुस्तकांपासून वंचित राहणार नाही याचे नियोजन शिक्षण विभागाने केले आहे.

### विद्यार्थ्यांना मिळणार प्राथमिक लष्करी प्रशिक्षण | देशभक्ती, शिस्त, स्वसंरक्षणाचे धडे

# शिपुरकर-वाघरे शाळेतून घडणार भावी सैनिक

| माणगाव | प्रतिनिधी |

राष्ट्रसेवेची प्रेरणा, शिस्तबद्ध जीवनशैली आणि आत्मविश्वासपूर्ण व्यक्तीमत्त्व घडविण्याच्या उद्देशाने माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर नारायण शिपुरकर आणि गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यमाच्या शाळेने एक अभिनव आणि महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. नव्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक सैनिक प्रशिक्षण सुरू करण्यात येणार असून या निर्णयाचे विद्यार्थी, पालक आणि शिक्षण क्षेत्रातून उत्स्फूर्त स्वागत होत आहे.



जिल्ह्यात शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या या शाळेने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देत शिक्षणासोबत राष्ट्रप्रेम आणि चारित्र्यनिर्मितीचा संस्कार देण्याचा संकल्प केला आहे. त्यामुळे हा उपक्रम केवळ प्रशिक्षणापुरता मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करणारा ठरणार आहे.

या प्रशिक्षणासाठी सातारा येथील कमांडो ट्रेनिंग फोर्समधील निवृत्त लष्करी अधिकारी, अनुभवी एनसीसी कॅडेट्स तसेच क्रीडा प्रशिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. तिरंदाजी, रायफल शूटिंग, तलवारबाजी, योगा, लाठी-काठी, रोप आणि पोल मल्लखांब, ड्रिल, कमांडो पी.टी., स्वसंरक्षण, ट्रेकिंग आणि विविध साहसी उपक्रमांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे.

आजच्या धकाधकीच्या आणि स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक ताकद, नेतृत्वगुण, संकटांचा सामना करण्याची क्षमता आणि राष्ट्राप्रती कर्तव्यभावना निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे. लहान वयातच सैनिक प्रशिक्षणाची ओळख झाल्याने विद्यार्थ्यांच्या मनात देशभक्तीची ज्योत प्रज्वलित होईल आणि ते भविष्यात आदर्श, जबाबदार व कर्तव्यनिष्ठ नागरिक म्हणून घडतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

विशेष म्हणजे, या प्रशिक्षणाचा लाभ भविष्यात सैन्यदल, पोलीस दल, एनसीसी तसेच विविध सुरक्षा दलांच्या भरतीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांना होणार आहे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रही प्रदान करण्यात येणार आहे.

### राष्ट्रसेवेचे स्वप्न रुजविणार

विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रसेवेचे स्वप्न रुजविणारा आणि देश प्रथम ही भावना जागविणारा हा उपक्रम माणगावच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी एक नवा आदर्श निर्माण करणारा ठरणार असल्याची भावना पालकांमधून व्यक्त होत आहे.

# सुक्या मासळीचे दर वधारले



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

सद्या जुन महिना सुरु झाला असुन मासळीचा हंगाम अंतिम टप्प्यात आला असल्यामुळे सुक्या मासळीला अधिक मागणी वाढली आहे. पावसाळ्यासाठी सुखी मासळीची साठवण केली जाते. यामुळे सुक्या मासळीची मागणी वाढल्यामुळे सुक्या मासळीचे दर गगनाला भिडले आहेत.

पावसाळ्यात बेगमीसाठी ओल्या मासळीबरोबर सुक्या मासळीला मागणी वाढली आहे. राज्यभरातून सुक्या मासळीला मागणी असते. त्यामुळे मासळीची मोठी बाजारपेठेत असलेल्या ठिकाणी सुकी मासळी सुकविण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असुन सुकट, बोंबील, मांदेली, कोळंबी, बांगडा, माकटी, अंबाड ही बाजाराच्या ठिकाणी विक्रीसाठी आणले जात आहे. परंतु एरवी कमी असणारे भाव एका किलो मागे डबल वाढले असल्याचे बाजारात पाहावयास मिळत आहे.

हवामानाच्या अंदाजानुसार चार ते पाच दिवसात पावसाळा सुरु होणार असल्यामुळे पावसाळ्यासाठी सुक्या मासळीची साठवण करण्यासाठी सुक्या मासळीची मागणी वाढल्यामुळे त्यांचे दर ही वाढले आहेत तसेच दिवसेंदिवस वाळवून खारवट करण्याची प्रक्रिया न पडवणारी असल्यामुळे दरवर्षीपेक्षा यावर्षी सुक्या मासळीचे दर अधिक वाढल्याचे विक्रेत्याचे म्हणणे आहे.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे मसद खुर्द, ता.पेण, जि.रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत असुन सदर मिळकतीचे विद्यमाने मालक/कब्जेदार यांचेकडून सदर मिळकत आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे -मसद खुर्द, ता. पेण, जि. रायगड येथिल**

| मालक/कब्जेदाराचे नाव | गट क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| धर्मेंद्र रघुनाथ पाटील<br>महेश रघुनाथ पाटील<br>सरीता प्रकाश पाटील | १०५ | - | १-०३.५० | १५.२५ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील धर्मेंद्र रघुनाथ पाटील वगैरे ३ यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. ०९/०६/२०२६.

**श्री. तुषार द.देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं. ए-२, जय नगर को.ऑप हौ.सोसा.लि. कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६, जि. रायगड. मोबाईल नं.९३२५००४००८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकती तिचे मालक दिपा संदिप आंबवणे मे.महालक्ष्मी बिल्डर्स ॲड डेव्हलपर्स तर्फे पार्टनर मोहम्मद नेयाजुल हक शेख यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे दहिवली तर्फे नीड, ता.कर्जत, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (चौ.मीटर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| १२५ | ३ | ५.३०.०० | १०.६० |
| १२५ | ४ | ५.६०.०० | १०.५० |

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजुन वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहुन येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि.९/६/२०२६

**ॲड.कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस,एलएल.बी
प्रभात अपार्टमेंट रूम नं.४ दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता.कर्जत जि.रायगड
मो.नं.९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**निविदा अधिसूचना**

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** वर्ष 2026-27 साठी एसएसई/वर्क्स/माणगाव विभागांतर्गत किरकोळ कामे, दुरुस्तीची कामे आणि साहित्य पुरवठा यांसाठी नॉन पीवे विभागीय देखभाल करार. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डिवायसीईडब्ल्यू-झोनल-7-2026 दिनांक: 09/06/2026**, **एकूण अंदाजित खर्च:** ₹ 41,60,698.18/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 16/06/2026, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 30/06/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 12 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

## वाडी विकणे आहे

चौल येथे अंदाजे अर्धा हेक्टर वाडी एकसंध विकणे आहे.
किंमत रू.६ कोटी.

**संपर्क ९१३७७८२४५१**


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


अर्जदारातर्फे ॲड.रश्मी रणजित राऊत

## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश व. स्तर सो.यांचे कोर्टात**

दिवाणी चौकशी अर्ज क्र.३७/२०२६

१. श्रीमती. अलका कमलाकर वडे.
वय - ७५ वर्षे, धंदा - गृहिणी,
२. श्री.दिपक कमलाकर वडे,
वय -५१ वर्षे, धंदा-मोलमजुरी — अर्जदार
३. सौ. दिपाली जयवंत कर्णेकर
पूर्वाश्रमीची दिपाली कमलाकर वडे.
वय-४६ वर्षे, धंदा-गृहिणी
क्र.१ ते ३ रा.गणेश मंदिराजवळ,
शास्त्रीनगर, ता.अलिबाग, जि.रायगड.
४. सौ. रुपाली निलेश माळी
पुर्वाश्रमीची रुपाली कमलाकर वडे,
वय-४० वर्षे, धंदा-गृहिणी
रा. भगवती मंदिराजवळ, भगवती,
चौल, ता. अलिबाग, जि. रायगड
५. सौ. स्नेहा समीर चौधरी
पूर्वाश्रमीची स्वप्नाली कमलाकर वडे,
वय - ३९ वर्षे, धंदा - गृहिणी
रा.द्वारा समीर चौधरी, १२४,
मु.पो.पोयंजे, ता.पनवेल, जि.रायगड,

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीनें तमाम जनतेस कळविण्यात येते की.

अर्जदार हे वरील पत्त्यावर राहत असून अर्जदार क्र.१ यांचे पती कै.कमलाकर दत्ताराम वडे मौजे अलिबाग येथील सिव्हील हॉस्पीटल अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड येथे दिनांक ३०/०४/२०२३ रोजी मयत झाले आहेत.

अर्जदार क्र.१ यांचे पती कै. कमलाकर दत्ताराम वडे यांच्या मृत्यूपूर्वी त्यांचे नावे तीन चाकी रिक्षा नं. MH06J2716 होती व आहे. सदरची गाडी अर्जदार यांच्या नावे होणे करीता अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत म्हणून वारस दाखला मिळणेकरीता अर्जदार यांनी मे.कोर्टात वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला
आहे.

सदर अर्जाबाबत कोणचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी दिनांक ०८/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. मे. कोर्टापुढे सर्व पुराव्यानिशी स्वतः किंवा २५/६ वकीलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे.

सदरहु मुदतीत जर सदरच्या अर्जास कुणाचीही कसलीही हरकत आली नाही तर मे.कोर्ट अर्जदाराच्या अर्जावर योग्य तो हुकुम करुन अर्जदार हेच कै. कमलाकर दत्ताराम वडे यांना कायदेशीर वारस आहेत असे आदेश देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १ जून २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

| सही/- | सही/- |
|---|---|
| **कनिष्ठ लिपीक** | **अधिक्षक** |
| **दिवाणी न्यायालय व.स्तर अलिबाग** | **दिवाणीयालय व.स्तर अलिबाग** |

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, दिनांक २१/०५/२०२६ रोजी दैनिक कृषीवल या वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेली मौजे भिसे येथील गट नं.१११ या मिळकतीचे हरकतीची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. मौजे भिसे येथील गट नं.१११ या मिळकतीचा नजरचुकीने चुकीच्या ७/१२ चा उल्लेख सदर नोटीसमध्ये करण्यात आलेला असल्याने सदर मिळकतीसंदर्भात कोणताही व्यवहार झालेला नसल्याचे जमीन मालकांनी कळविल्यामुळे आणि संबंधित जमीन मालक यांचेसोबत कोणतीही बोलणी झालेली नसल्याने प्रसिद्ध करण्यात आलेली दिनांक २१/०५/२०२६ रोजी नोटीस चुकीची असून नजरचुकीने आणि अनावधाने चुकीची माहिती संबंधित एजंट यांने पुरवल्यामुळे सदर दिनांक २१/०५/२०२६ रोजी मौजे भिसे येथील गट नं.१११ या मिळकती संदर्भात प्रसिद्ध केलेली हरकतीची नोटीस चुकीची आहे असे समजण्यात येऊन सदर प्रसिद्ध केलेली दिनांक २१/०५/२०२६ रोजीची हरकतीची नोटीस रद्द करण्यात येत आहे. कोणतीही तांत्रिक अडचण राहू नये याकरीता ही जाहीर सूचना सर्व लोकांस कळविण्याकरीता सदरची नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर नोटीस माझे जबाबदारीवर देत आहे.

दिनांक : ०८/०६/२०२६

सही/-
**ॲड. विराज वसंत पाटील**
मु.पो.चिंचोटी
ता.अलिबाग, जि.रायगड
७२७६७३७६२१

## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीनमिळकत संदर्भित जमीनमिळकतीचे विद्यमान मालक १) श्रीमती. सुशिला चंद्रकांत म्हात्रे, २) श्री. सुरेश चंद्रकांत म्हात्रे, ३) श्रीमती. सुनंदा चंद्रकांत म्हात्रे, ४) श्री. रमेश चंद्रकांत म्हात्रे, ५) श्रीमती. जयश्री चंद्रकांत म्हात्रे व ६) श्रीमती. राजश्री चंद्रकांत म्हात्रे यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व त्या आशयाचा साठेकरार माझे अशील व विद्यमान जमीनमालक यांचे दरम्यान स्वाक्षरीत झालेला आहे. संदर्भित जमीनमिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीनमिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत /हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**: संदर्भित जमीनमिळकतीचे परिशिष्ट :**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| कोळगांव, ता.अलिबाग, जि.रायगड. | ५५/२ | ०-३०-२० | ४.१४ |

अलिबाग,
दिनांक : ०९/०६/२०२६.

**राजेंद्र दा. पाटील,**
ॲडव्होकेट.
कृष्णवंदन-२, ब्राम्हणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड,
मो.- ९८२२५२८९३१,
ईमेल -adv. rdpatil@gmail.com

**उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव, जि.रायगड यांजकडून**
**क्रमांक – उविअमा – भूसं / कात –२/ एस.आर. १८० / २०२६,**

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा दोन) चे कलम १, पोट कलम (३) अन्वये काढण्यात आलेली व दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र, भाग चार ब, पृष्ठ क्र. २ ते ३ वर प्रसिद्ध करण्यात आलेली उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक आयडीसी २०२४ / (प्र.क्र.४८) / उ–१४ अन्वये उक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे खालील अनुसूचित विनिर्दीष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रास फेब्रुवारी २०२६ या महिन्याच्या तेराव्या दिवसापासून अंमलात येतील, असे महाराष्ट्र शासनाने निर्देश दिले आहेत;

आणि ज्याअर्थी, या खालील अनुसूचीत नमूद केलेल्या जमिनी हया उक्त प्रकरण सहाचे उपबंध उपरोक्ताप्रमाणे अंमलात आले आहेत, अशा क्षेत्रांत आहेत;

आणि ज्याअर्थी, अधिनियमाचे प्रकरण सहा हे ज्या क्षेत्रांस लागू करण्यात आले आहे, अशा क्षेत्रांत असणाऱ्या आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (यानंतर ज्याचा ''उक्त महामंडळ'' असा उल्लेख करण्यात आला आहे) विकास करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा उक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पृष्टयर्थ असेल, अशा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ आवश्यक असणाऱ्या जमिनी संपादन करण्याची शक्ती उक्त अधिनियमांच्या कलम ३२ अन्वये राज्यशासनास प्रदान करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २, खंड (क) अन्वये काढण्यात आलेली अधिसूचना क्रमांक आयडीसी /१८९२ (१७४४१), उद्योग–१४, दिनांक ११ जून, १९९३ अन्वये राज्य शासनाचे महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ यातील नियम २८ अन्वये जी कामे जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली आहेत, अशी उक्त अधिनियमाचे कलम ३२, कलम ३३ पोटकलम (२), कलम ३६ व कलम ३८ खालील जिल्हाधिकाऱ्यांची कामे पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग माणगांव यांची नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी, औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी सोबतच्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या जमिनी महामंडळास आवश्यक आहेत, असे उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव यांचे मत झाले आहे;

त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३२ पोटकलम (२) अन्वये उपरोक्त प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या राज्य शासनाच्या शक्तींचा वापर करुन याद्वारे उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव खाली नमूद केलेल्या जमिनीमध्ये संबंधीत भोगवटादार तसेच इतर कोणत्याही व्यक्तिचा हितसंबंध आणि कोणताही अधिकार असणाऱ्या सर्व व्यक्तींना खाली उल्लेख केलेल्या जमिनीमध्ये उक्त प्रयोजनार्थ भूसंपादन का करण्यात येवू नये? या संबंधी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत खाली सही करणाऱ्यास लेखी स्वरुपात कारणे दाखविण्याबद्दल नोटीस देत आहे.

ज्यांची व्यक्तीगत सुनावणी करण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीसीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत खाली सही करणाऱ्यांच्या कार्यालयात माणगांव येथे समक्ष जातीने किंवा आपल्या कायदेशीर मुखत्यारामार्फत हजर राहता येईल.

ठिकाण –माणगांव,
दिनांक – २७/०५/२०२६.

सही/–
**(डॉ.संदीपान सानप)**
**उपविभागीय अधिकारी,**
**माणगांव उपविभाग, माणगांव**

**अनुसूची**

**जिल्हा – रायगड, तालुका – रोहा, गांव – कामत**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर / गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | ७४ | पैकी | ०.२८० |
| २. | ६९ | १+२+३ पैकी | ०.५७० |
| ३. | १६० | पैकी | १.०६० |
| ४. | १४८ | पैकी | १.१९० |
| ५. | १४५ | १+२ पैकी | ०.०३० |
| ६. | १४६ | पैकी | ०.०८० |
| ७. | १३९ | पैकी | ०.११० |
| ८. | १४४ | पैकी | ०.०७८ |
| ९. | १४० | पैकी | ०.२८० |
| १०. | १४१ | ० | ०.०७६ |
| ११. | १४२ | पैकी | ०.२७० |
| | | एकुण | ४.०२४ |

ठिकाण – माणगांव,
दिनांक –२७/०५/२०२६.

सही/–
**(डॉ. संदीपान सानप)**
**उपविभागीय अधिकारी,**
**माणगांव उपविभाग, माणगांव**

**क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/३७/६९१/२०२६**

## पाडेकरी पाहिजेत

चौल येथे नारळ आणि सुपारीच्या पाडा करण्यास अनुभवी पाडेकरी पाहिजेत.

**संपर्क ९१३७७८२४५१**

## जाहिर नोटीस

या जाहीर नोटीशीने सर्वांना कळविणेत येते की, खालील नमुद मिळकतींचे मालकानी खालील नमुद मिळकत आमचे अशिल सौ. स्वाती कुंदन महाजन ऊर्फे स्वाती बढे, सौ. मेघना जितेंद्र नारखेड ऊर्फे मेघना एकनाथ खडसे, सौ. मिनल जितेंद्र नेहेते ऊर्फे मिनल रघुनाथ नारखेडे, यांना विकत देण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणताही हक्कहितसंबंध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहाण, दान, हक्कसोडपत्र, बक्षिस, फरोक्त वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन चौदा दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेल्या कोणत्याही हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहाणार नाहीत हे कळावे.

**मौजे सालवड, ता. कर्जत, जि. रायगड येथिल मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे. गुंठे पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| श्री. मधुकार घनश्याम पवार | ५३/१/अ/३ | ०-०९-३०<br>पो.ख ०-०९-३०<br>एकुण ०-१८-६० | ०-३२ |

ता. ७ जुन २०२६

खरेदीदारातर्फे
**सचिन दिलीप बासरे**
ॲडव्होकेट
रा. डेझी को. ऑ.हौ.सो. रूम नं १०३
तिसरा मजला, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ७६६६३९३७७६०

## जाहिर नोटीस

या जाहीर नोटीशीने सर्वांना कळविणेत येते की, खालील नमुद मिळकतींचे मालकानी खालील नमुद मिळकत आमचे अशिल सौ. स्वाती कुंदन महाजन ऊर्फे स्वाती बढे, सौ. मेघना जितेंद्र नारखेड ऊर्फे मेघना एकनाथ खडसे, सौ. मिनल जितेंद्र नेहेते ऊर्फे मिनल रघुनाथ नारखेडे, यांना विकत देण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणताही हक्कहितसंबंध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहाण, दान, हक्कसोडपत्र, बक्षिस, फरोक्त वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन चौदा दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेल्या कोणत्याही हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहाणार नाहीत हे कळावे.

**मौजे सालवड, ता. कर्जत, जि. रायगड येथिल मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे. गुंठे पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| श्री. संतोष जयराम गिरकर | ५३/१/ब | ०-२४-३०<br>पो. ख ०-०३-३०<br>एकुण ०-२७-६० | १-०९ |

ता. ७ जुन २०२६

खरेदीदारातर्फे
**सचिन दिलीप बासरे**
ॲडव्होकेट
रा. डेझी को. ऑ.हौ.सो. रूम नं १०३
तिसरा मजला, ता.कर्जत, जि.रायगड.
मो.नं. ७६६६३९३७७६०

# निवडक

## तमीम बांगलादेश बोर्डाचे अध्यक्ष


**ढाका :** बांगलादेशचे माजी कर्णधार तमीम इक्बाल यांची बांगलादेश क्रिकेट बोर्डचे नवे अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. रविवारी ढाका येथे झालेल्या निवडणुकीत ते बिनविरोध निवडून आले आणि आता चार वर्षांसाठी या पदावर राहतील.३७ वर्षीय तमीम एप्रिलपासून अंतरिम अध्यक्ष म्हणून काम करत होते, जेव्हा बांगलादेश सरकारने चे संचालक मंडळ बरखास्त केले होते. ते चे २१ वे अध्यक्ष बनले आहेत. तमीम यांनी गेल्या वर्षी जानेवारीमध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. त्यांनी बांगलादेशसाठी आपला शेवटचा सामना सप्टेंबर २०२३



मध्ये खेळला. त्यांनी फेब्रुवारी २००७ मध्ये झिम्बाब्वेविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यातून आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला सुरुवात केली.या निवडणुका बांगलादेश सरकारने एप्रिलमध्ये अंतरिम संस्थेअंतर्गत आयोजित केल्या होत्या. यापूर्वी, सरकारने एका चौकशी समितीच्या अहवालाच्या आधारे अमीनुल इस्लाम यांच्या नेतृत्वाखालील मागील निवडून आलेली संस्था विसर्जित केली होती. चौकशी समितीला अमीनुल आणि त्यांच्या बोर्ड सदस्यांना भ्रष्टाचारात सामील असल्याचे आढळले होते आणि त्यांनी संविधानात सुधारणा करण्याची शिफारस केली होती. निवडणुकीनंतर झालेल्या पहिल्या बोर्ड बैठकीत फहीम सिन्हा यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांना ६६ मते मिळाली होती. यासोबतच २५ सदस्यीय मंडळाची स्थापना पूर्ण झाली, जे पुढील चार वर्षे बांगलादेश क्रिकेटचे संचालन करेल.

## शमीची ईडन गार्डन्सवर हॅट्ट्रिक

**नवी दिल्ली :** भारतीय वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने बंगाल टी-२० लीगच्या तिसऱ्या हंगामात हॅट्ट्रिक घेतली. शनिवारी ईडन गार्डन्सवर सिलीगुडी स्ट्रायकर्स आणि राढ टायगर्स यांच्यात सामना खेळला गेला. या सामन्यात मोहम्मद शमीने हॅट्ट्रिक घेऊन



आपल्या सिलीगुडी स्ट्रायकर्स संघाला २४ धावांनी विजय मिळवून दिला. नाणेफक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना सिलीगुडी स्ट्रायकर्सने विशाल भाटीच्या ८६ धावांच्या धडाकेबाज खेळीच्या मदतीने २० षटकांत ४ गडी गमावून २०८ धावांचा मोठा डोंगर उभा केला होता. प्रत्युत्तरात राढ टायगर्सचा संघ २० षटकांत ९ गडी गमावून १८४ धावाच करू शकला. सिलीगुडीसाठी शमीने २७ धावा देऊन ४ बळी घेतले, तर करण लालने ३६ धावा देऊन ३ बळी मिळवले. सामन्याच्या १६व्या षटकात मोहम्मद शमीने षटकाच्या चौथ्या चेंडूवर शाहबाज अहमदला बाद केले. त्यानंतर पुढच्याच चेंडूवर (पाचव्या चेंडूवर) रोहित कुमारला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. षटकाच्या शेवटच्या म्हणजेच सहाव्या चेंडूवर दीपांजन मुखर्जीला बाद करून शमीने आपली हॅट्ट्रिक पूर्ण केली. शमीने आपल्या ४ षटकांच्या कोट्यात एकूण २७ धावा देऊन ४ महत्त्वाचे बळी घेतले.

## सुर्यवंशीला भरावा लागणार इन्कम टॅक्स?

**नवी दिल्ली :** आयपीएलमध्ये धमाकेदार बल्लेबाजी करुन सर्वांची वाहवा मिळवणारा अवघ्या १५ वर्षांचा वैभव सुर्यवंशी हा भारतीय क्रिकेटचा नवा स्टार बनला आहे. कमी वयातच वैभव सुर्यवंशी याने कोट्यवधींची कमाई केली आहे. त्यामुळे लोकांच्या मनात एक प्रश्न आहे की अल्पवयीन असल्याने त्याला इन्कम टॅक्समधून सुट मिळणार का? का त्याला आयकर भरावा लागणार आहे.
सर्वसाधारणपणे आयकर कायद्यांतर्गत कोणत्याही अल्पवयीन मुलाच्या उत्पन्नाला त्यांच्या पालकाच्या उत्पन्नाला जोडले जाते. यास क्लबिंग ऑफ इन्कम म्हटले जाते. यानंतर त्या उत्पन्नावर आई-वडीलांच्या टॅक्स स्लॅबनुसार कर लावला जातो. मात्र, या नियमात काही महत्वाचे अपवाद आहे. जर एखादा अल्पवयीन विशेष प्रतिभा, कौशल आणि मेहनतीआधारे कमाई करत असेल, तर त्याचे उत्पन्न हे आई-वडीलांच्या उत्पन्नात जमेस धरले जात नाही. यात खेळ, अभिनय, गायन, कला आणि अन्य क्षेत्रातील प्रतिभेने होणाऱ्या उत्पन्नाचा समावेश केला जातो. वैभव सूर्यवंशी याची कमाई क्रिकेट आणि त्यांची कामगिरीमुळे आहे. त्यामुळे आयकर नियमांनुसार यात त्याच्या उत्पन्नाला स्वतंत्र उत्पन्न मानले जाणार. म्हणजे त्यांची कमाई क्लबिंग ऑफ इन्कम च्या नियमात येत नाही. मात्र, याचा अर्थ असा नाही की त्याची कमाई संपूर्णपणे करमुक्त असेल. जर त्यांचे एकूण उत्पन्न आयकर विभागाने निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त आहे. तर त्यावर नियमानुसार टॅक्स द्यावा लागणार आहे. मात्र, वैभव अल्पवयीन आहे, त्यामुळे त्याच्या नावाने आयकर रिटर्न त्याचे आई-वडील वा कायदेशीर पालकांद्वारा दाखल केले जाईल. रिटर्नमध्ये त्यांच्या क्रिकेटमधून झालेली जास्त कमाई, ब्रँड एंडोर्समेंट, पुरस्कार रक्कम वा अन्य उत्पन्नाचे विवरण दिले जाईल.

## 'आव्हानांचा सामना करणे नेहमीचेच'

**मुंबई :** लहानपणापासूनच आव्हानांचा सामना करणे मला आवडले आहे. मुंबई क्रिकेटमध्ये मोठी स्पर्धा असल्याने येथे प्रत्येक गोष्टीसाठी झगडावे लागते. त्यामुळे आता देशाच्या टी-२० संघाचे नेतृत्व करण्याची नवी जबाबदारी मिळाली असली, तरी यामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वात किंवा स्वभावात कोणताही बदल होणार नाही, असे मत भारताचा नवनियुक्त कर्णधार श्रेयस अय्यरने व्यक्त केले.३१ वर्षीय श्रेयसची शनिवारी भारतीय टी-२० संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली आहे. त्याने सूर्यकुमार यादवची जागा घेतली असून सूर्यकुमारच्या नेतृत्वाखाली भारताने मार्च महिन्यात टी-२० विश्वचषक जिंकला होता. मात्र श्रेयसकडे भविष्याचा विचार करता नेतृत्व सोपवण्यात आले आहे. मुंबईतील क्रिकेटच्या आव्हानात्मक वातावरणात वाढलेला तोच व्यक्ती म्हणून मला पुढे जायचे आहे, असे अय्यरने मुंबईतील एका कार्यक्रमादरम्यान सांगितले. एखादी जबाबदारी खांद्यावर आली, म्हणून आपले व्यक्तिमत्त्व बदलण्याची गरज नाही. आपण पूर्वी जसे होतो तसेच राहू, कोणाच्या छायेत राहण्याचा किंवा इतर कोणासारखे बनण्याचा प्रयत्न करणार नाही, असे श्रेयस म्हणाला. मुंबईत क्रिकेटचे महत्त्व मोठे असून तेथील स्पर्धा खूप तीव्र असते आणि गल्लीबोळातील प्रत्येक मुलाला मुंबईचे प्रतिनिधित्व करायचे असते, त्यामुळे मुंबईत लहानाचा मोठा होताना आपल्याला आव्हाने नेहमीच आवडली, असेही श्रेयसने नमूद केले.

# भारताचा अफगाणिस्तानवर विक्रमी विजय!

## ■ मानव सुथारची भेदक गोलंदाजी; पदार्पणात घेतले ६ बळी

**| मुल्लानपूर | वृत्तसंस्था |**

येथील महाराजा यादविंद्र सिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील एकमेव कसोटी सामना खेळला गेला. या सामन्यात भारतीय संघाने अफगाणिस्तानचा एक डाव आणि ३०० धावांनी दणदणीत पराभव करत एकतर्फी वर्चस्व गाजवलं आहे. अफगाणिस्तानचा पहिला डाव अवघ्या १५२ धावांवर संपुष्टात. भारताने पहिल्या डावात उभारलेल्या प्रचंड धावसंख्येमुळे यजमान संघाला ४१२ धावांची भक्कम आघाडी मिळाली. त्यामुळे अफगाणिस्तानवर फॉलोऑनची नामुष्की ओढवली.

दुसऱ्या डावातही अफगाण फलंदाज भारतीय गोलंदाजांसमोर टिकू शकले नाहीत. संपूर्ण संघ केवळ ११२ धावांत गारद झाला आणि भारताने सामना सहज खिशात घातला. या विजयाचा सर्वात मोठा शिल्पकार ठरला पदार्पणवीर मानव सुथार.




आपल्या पहिल्याच कसोटीत त्याने प्रभावी गोलंदाजी करत अफगाणिस्तानच्या फलंदाजीची अक्षरशः दाणादाण उडवली.

कर्णधार गिल याने टॉस जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. टीम इंडियासाठी पहिल्या डावात दोघांनी शतकं आणि तिघांनी अर्धशतकं ठोकलं. या जोरावर टीम इंडियाने दुसऱ्या दिवशी पहिला डाव हा १२७ ओव्हरमध्ये ८ आऊट ५६४ रन्सवर घोषित केला. टीम इंडियासाठी शुबमन गिल आणि के एल राहुल या दोघांनी शतक ठोकलं. शुबमनने १२६ तर के एलने १० धावा केल्या. तसेच साई सुदर्शन आणि ऋषभ पंत या दोघांनी प्रत्येकी ८१ धावा केल्या. तसेच वॉशिंग्टन सुंदर याने नाबाद ५२ धावांचं योगदान दिलं. तर इतरांनीही छोटी खेळी करत भारताला ५५० पार पोहचवण्यात हातभार लावला. अफगाणिस्तानासाठी मोहम्मद सलीम साफी याने सर्वाधिक ६ विकेट्स मिळवल्या.


अफगाणिस्तानला पहिल्या डावात काही खास करता आलं नाही. भारताने ५८.४ ओव्हरमध्ये १५२ रन्सवर ऑलआऊट केलं. अफगाणिस्तानसाठी रहमत शाह याने ६० रन्स केल्या. तर कॅप्टन हशमतुल्लाह शाहीदी याने २० धावांचं योगदान दिलं. त्याव्यतिरिक्त कुणालाही २० हा आकडा गाठता आला नाही. नव्याने पदार्पण करणाऱ्या मानव सुथारने सर्वाधिक ६ विकेट्स घेतल्या. प्रसिद्धने तिघांना बाद केलं. वॉशिंग्टन सुंदरने १ विकेट मिळवत अफगाणिस्तानचं पॅकअप करण्यात योगदान दिलं.

# इव्हेरेव्हने पहिले ग्रँड स्लॅम विजेतेपद जिंकले

## ■ फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धा
## ■ अंतिम फेरीत कोबोलीला हरवले

**| पॅरिस | वृत्तसंस्था |**

जर्मनीच्या अलेक्झांडर इव्हेरेव्हने आपल्या कारकिर्दीतील पहिले ग्रँड स्लॅम विजेतेपद जिंकले आहे. त्याने फ्रेंच ओपन २०२६ च्या अंतिम फेरीत इटलीच्या फ्लेव्हियो कोबोलीला हरवले. पॅरिसमध्ये रविवारी खेळल्या गेलेल्या पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात दुसऱ्या मानांकित इव्हेरेव्हने दहाव्या मानांकित फ्लेव्हियोला पाच सेटमध्ये ६-१, ४-६, ६-४, ६-७, ६-१ असे हरवले.



२९ वर्षीय इव्हेरेव्ह ११ वर्षांपासून ग्रँड स्लॅम स्पर्धांमध्ये खेळत आहे. यापूर्वी तो ग्रँड स्लॅममध्ये तीन वेळा अंतिम फेरीत आणि सात वेळा उपांत्य फेरीत हरला होता. फ्रेंच ओपन व्यतिरिक्त, ऑस्ट्रेलियन ओपन, विम्बल्डन आणि यूएस ओपनला ग्रँड स्लॅम टेनिस स्पर्धा म्हटले जाते.

इव्हेरेव्हने सामन्याची सुरुवात धमाकेदार पद्धतीने करत पहिला सेट ६-१ ने सहज जिंकला. यानंतर कोबोलीने पुनरागमन केले आणि दुसरा सेट ६-४ ने जिंकला. इव्हेरेव्हने पुन्हा तिसरा सेट ६-४ ने जिंकला, पण कोबोलीने चौथा सेट टाय-ब्रेकरमध्ये ७-६(५) ने जिंकून सामना पाचव्या सेटमध्ये नेला. अंतिम सेटमध्ये इव्हेरेव्हने पुन्हा एकदा ६-१ ने एकतर्फी विजय मिळवला.

इव्हेरेव्ह फ्रेंच ओपनचे विजेतेपद जिंकणारे ८९ वर्षांनंतर पहिले जर्मन पुरुष खेळाडू बनले आहेत. त्यांच्या आधी १९३७ मध्ये जर्मनीच्या हेनर हेन्केल यांनी ही स्पर्धा जिंकली होती. तर, कोणतेही ग्रँड स्लॅम एकेरीचे विजेतेपद जिंकणारे शेवटचे जर्मन पुरुष खेळाडू बोरिस बेकर होते, ज्यांनी १९९६ मध्ये ऑस्ट्रेलियन ओपन जिंकले होते.

इव्हेरेव्ह मास्टर्स १००० स्पर्धांसह दोन एटीपी फायनल्सही जिंकले आहेत. टोकियोमध्ये इव्हेरेव्हने ऑलिम्पिक सुवर्णपदकही जिंकले होते, पण त्यांच्या खात्यात ग्रँड स्लॅम विजेतेपद नव्हते. यापूर्वी २०२० यूएस ओपन, २०२४ फ्रेंच ओपन आणि २०२५ ऑस्ट्रेलियन ओपनचे अंतिम सामने ते हरले होते.

### वेस्ट इंडिज-श्रीलंका सामना
## पावसामुळे रद्द

**किंग्स्टन :** श्रीलंकेच्या वेस्ट इंडिज दौऱ्यातील दुसरा एकदिवसीय सामना पावसामुळे रद्द करण्यात आला. किंग्स्टन येथील सबीना पार्क स्टेडियमम ध्ये शनिवारी रात्री टॉस झाल्यानंतर एकही चेंडू टाकता आला नाही. बराच वेळ वाट पाहिल्यानंतर पंचांनी सामना रद्द केला.पावसामुळे टॉस निर्धारित वेळेपेक्षा ३० मिनिटे उशिरा झाला. वेस्ट इंडिजचा कर्णधार शाई होपने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, परंतु त्यानंतर खेळ होऊ शकला नाही. पहिला एकदिवसीय सामना हरलेल्या वेस्ट इंडिजसाठी हा सामना मकरो या मरोफ सारखा होता. सामना रद्द झाल्यामुळे त्यांची मालिका जिंकण्याची शक्यता संपुष्टात आली.यजमान संघ सोमवारचा तिसरा आणि अंतिम एकदिवसीय सामना जिंकून मालिका १-१ अशी बरोबरीत आणू शकतो.

### राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धा
## मल्हार कदमला तीन कांस्यपदके

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

कॅप्टन एस. जे. इझेकल मेमोरियल महाराष्ट्र स्टेट शूटिंग चॅम्पियनशिप या प्रतिष्ठित राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धेत कुलाबा रायफल व पिस्टल शूटिंग क्लबचा युवा नेमबाज मल्हार राहुल कदम याने उल्लेखनीय यश संपादन करत एकाच स्पर्धेत तीन कांस्यपदके पटकावली.

महाराष्ट्र रायफल असोसिएशन आयोजित या स्पर्धेत मल्हारने १० मीटर एअर रायफल प्रकारात ४०० पैकी ३८२ गुणांची उत्कृष्ट नोंद केली. या कामगिरीच्या जोरावर त्याने युथ, सब-युथ आणि ज्युनियर या तिन्ही गटांत प्रत्येकी एक अशी एकूण तीन कांस्यपदके आपल्या नावावर केली.

महाराष्ट्रातील नेमबाजांसाठी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांकडे वाटचाल करण्याचे महत्त्वाचे व्यासपीठ मानल्या




जाणाऱ्या या स्पर्धेत मिळव-लेले यश मल्हारच्या सातत्यपूर्ण सरावाचे आणि जिद्दीचे फलित मानले जात आहे. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ महाराष्ट्र रायफल असोसिएशनच्या वरळी येथील रेंजवर उत्साहात पार पडला. यावेळी अर्जुन पुरस्कार विजेते अशोक पंडित, शीला कानूंगो, चंद्रकांत पुजारी तसेच विधानपरिषद सदस्य दुष्यंत चतुर्वेदी हे मान्यवर उपस्थित होते. सेंटमेरी हायस्कूलमध्ये सातवीत शिक्षण घेणाऱ्या मल्हार कदमला प्रशिक्षक योगेश गडमाळे, मेहुल राठोड, मंदार गडकरी आणि यतिराज पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



# भारताने तिसरा अंडर-१८ हॉकी आशिया कप जिंकला

**| जपान | वृत्तसंस्था |**

भारताने तिसऱ्यांदा अंडर-१८ हॉकी आशिया कप जिंकला आहे. संघाने गतविजेत्या जपानचा अंतिम फेरीत ४-१ ने पराभव केला. यापूर्वी भारताने २००१ आणि २०१६ मध्ये विजेतेपद पटकावले होते. शनिवारी जपानच्या काकामिगाहारा येथे आशिष तानी पुर्तीने हॅट्ट्रिक केली.

कर्णधार केतन कुशवाहानेही एक गोल केला. यापूर्वी पाकिस्तानविरुद्धच्या उपांत्य फेरीतही आशिषने हॅट्ट्रिक करत ४ गोल केले होते. तर पाकिस्तानने मलेशियाला हरवून तिसरे स्थान निश्चित केले. दुसरीकडे, महिला संघाने दक्षिण कोरियाचा ३-० ने पराभव करून कांस्यपदक जिंकले. या गटात चीनने सुवर्णपदक पटकावले.

किताब जिंकल्यानंतर हॉकी इंडियाने पुरुष संघातील प्रत्येक खेळाडूला तीन-तीन लाख रुपये आणि सपोर्ट स्टाफच्या प्रत्येक सदस्याला दीड लाख रुपये देण्याची घोषणा केली.

## रोहितकडून श्रेयसला पाठिंबा

**मुंबई :** भारतीय क्रिकेट संघाचा दिग्गज फलंदाज रोहित शर्माने भारताचा नवनियुक्त टी-२० कर्णधार श्रेयस अय्यरच्या नेतृत्वक्षमतेचे कौतुक करत तो या भूमिकेत यशस्वी होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. तसेच त्याने सूर्यकुमार यादवच्या जिद्दीसह भारतीय संघासाठी दिलेल्या योगदानाचे कौतुक केले आहे. टी-२० मुंबई लीगमधील सोबो मुंबई फाल्कन्स आणि ट्रायम्फ नाइट्स मुंबई नॉर्थ ईस्ट यांच्यात शनिवारी रात्री झालेल्या सामन्यासाठी रोहित उपस्थित होता. लढतीपूर्वी रोहितने सोबोचा कर्णधार श्रेयस अय्यर, ट्रायम्फचा कर्णधार सूर्यकुमार यादव आणि मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांच्यासह छायाचित्रही काढले.वानखेडे स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात २१,७०८ चाहत्यांच्या उपस्थितीत श्रेयस अय्यरने ३६ चेंडूंत ६१ धावांची मॅचविनिंग खेळी केली.

# भारत २२ सुवर्णपदकांसह अव्वल स्थानी

### विश्व योगासन अजिंक्यपद स्पर्धा

**| एका अरेना | वृत्तसंस्था |**

एका अरेना येथे सुरू असलेल्या पहिल्या विश्व योगासन अजिंक्यपद स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी यजमान भारताने आपली सुवर्णपदकांची संख्या २२ पर्यंत वाढवली. याचबरोबर नेपाळ, जपान आणि अमेरिका यांनी प्रत्येकी एक सुवर्णपदक जिंकत आपली छाप पाडली. भारताने सलग तिसऱ्या दिवशीही वर्चस्व राखले असून विविध वयोगटांतील जवळपास सर्वच प्रकारांमध्ये पदकांची कमाई केली. भारताच्या खात्यात तिसऱ्या दिवसापर्यंत २२ सुवर्ण, ५ रौप्य आणि १ कांस्य पदक जमा झाले होते.

अर्जेंटिनाच्या नबिला सोल बाराझाने दोन सुवर्ण आणि दोन रौप्य पदके जिंकत आपल्या देशाला एकूण गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर नेले. सिंगापूर दोन सुवर्ण आणि दोन कांस्य पदकांसह तिसऱ्या स्थानावर घसरला. नेपाळने एक सुवर्ण,



सहा रौप्य आणि तीन कांस्य पदकांसह चौथे स्थान पटकावत पदकतालिकेत मोठी झेप घेतली.पहिली विश्व योगासन अजिंक्यपद स्पर्धा हा योगासन क्रीडेच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. भारताच्या प्राचीन योग परंपरेचे जागतिक स्पर्धात्मक क्रीडाप्रकारात रूपांतर करताना ऑलिम्पिक चळवळीत मान्यता मिळविण्याच्या दिशेने हा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न मानला जात आहे.

यजमान भारताने १२२ सदस्यीय पथक उतरवले असून खेळाडू सहा वयोगटांमध्ये सहभागी झाले आहेत. यात सब-ज्युनियर (१०-१४ वर्षे), ज्युनियर (१४-१८ वर्षे), सीनियर (१८-२८ वर्षे), सीनियर ए (२८-३५ वर्षे), सीनियर बी (३५-४५ वर्षे) आणि सीनियर सी (४५-५५ वर्षे) या गटांचा समावेश आहे.सीनियर ए महिला पारंपरिक योगासन प्रकारात भारतासाठी पहिले सुवर्णपदक जिंकणाऱ्या रितू मंडलने संघ प्रकारातही सुवर्णपदक जिंकत आपली पदकसंख्या दोनवर नेली.

### दक्षिण आशियाई महिला फुटबॉल स्पर्धा | बांगलादेशला ३-१ ने हरवले

# भारताचा महिला संघ ठरला अजिंक्य

**| मडगाव | वृत्तसंस्था |**

भारतीय महिला फुटबॉल संघाने ७ वर्षांनंतर दक्षिण आशियाई फुटबॉल चॅम्पियनशिप जिंकली आहे. त्यांनी शनिवारी रात्री झालेल्या अंतिम सामन्यात गतविजेत्या बांगलादेशला ३-१ ने हरवले. भारताने विक्रमी सहाव्यांदा ही स्पर्धा जिंकली आहे. गोव्यातील मडगाव येथील पंडित जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये भारतासाठी प्यारी जाख्सा, सनफिदा नोंगरुम आणि लिंडा कोम सेर्तो यांनी प्रत्येकी एक गोल केला. बांगलादेशसाठी रितु पोर्णाने एकमेव गोल केला.




भारताकडून प्यारी जाख्साने ४२व्या मिनिटाला पहिला गोल केला. पहिल्या हाफच्या इंजरी टाइममध्ये रितू पोर्णा चकमाने गोल करून बांगलादेशला बरोबरी साधून दिली. दुसऱ्या हाफच्या सुरुवातीला सनफिदा नोंगरुमने शानदार हेडर लावून भारताला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर भारतीय संघाने खेळावर नियंत्रण ठेवले. ८२व्या मिनिटाला लिंडा कोम सेर्तोने बांगलादेशी बचावफळीच्या चुकीचा फायदा घेत तिसरा गोल केला आणि भारताचा विजय निश्चित केला. यजमान भारत संपूर्ण स्पर्धेत अजिंक्य राहिला. संघाने सर्व चार सामने जिंकले, १८ गोल केले आणि केवळ एक गोल खाल्ला. विद्यमान विजेता बांगलादेशची सलग तिसऱ्यांदा विजेतेपद पटकावण्याची आशाही भंग झाली. अंतिम सामन्यानंतर भारतीय गोटात जल्लोषाचे वातावरण होते. अनुभवी खेळाडू डांगमेई ग्रेसने याच सामन्यानंतर फुटबॉलला निरोप दिला.

### अवेका सिंहचे सर्वाधिक गोल

स्पर्धेच्या पुरस्कारांमध्येही भारतीय खेळाडूंचे वर्चस्व राहिले. अवेका सिंह चार गोलांसह सर्वाधिक गोल करणारी ठरली. सनफिदा नोंगरुमला मोस्ट व्हॅल्युएबल प्लेयर म्हणून निवडण्यात आले आणि पंथोई चानू एलांगबामला सर्वोत्कृष्ट गोलकीपरचा पुरस्कार मिळाला. नेपाळला फेअर प्ले पुरस्कार देण्यात आला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)